संत राजिन्दर सिंह जी महाराज
यांच्या पावन सानिध्यात
मंगळवार, मार्च, 31/2026
संगत दर्शन - सायं 7 वाजता
बुधवार, एप्रिल, 1/2026
सत्संग - सायं 7 वाजता
नामदान (दिक्षा) - रात्री 9 वाजता
मिस्कीन मळा, गंगा उद्यान शेजारी, मिस्कीन नगर, सावेडी. अहिल्यानगर - 414003
7071050505/9067894213
www.sos.org



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. ३१.०३.२०२६ | अंक नं. २९९ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



एन.ए.प्लॉट विकणे/भाड्याने देणे
साईट : अहिल्यानगर-छ.संभाजीनगर हायवे, धनगरवाडी
1 एकर 9 गुंठे
49 हजार स्के.फू.
* एन.ए. प्लॉट (नॉन ॲग्रीकल्चर)
* क्लिअर टायटल
* हाईवे रोडटच
* पेट्रोलपंप (पासप्लॅनची शक्यता)
* व्यवसायीक अथवा इंडस्ट्रीयल वापरासाठी उपयुक्त
* वेअरहाऊस, व्यावसायिक ईमारत इंडस्ट्रियल वापर, हॉटेल, ढाबा आदिंसाठी उपयुक्त.
नवीन कलेक्टर ऑफिसपासून ११ कि.मी.अंतरावर
Mo.9890 89 7472



स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
१०१ भाग्यवंत जोडप्यांना चक्क FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090



समता पतसंस्था
नो रिस्क, रिटर्न्स फिक्स
११००+ कोटींच्या ठेवी
संपर्क : ७७२२ ०१० २२२
ठेवींवर मिळवा १०% पर्यंतचे व्याज
लिक्विडिटी बेस प्रोटेक्शन स्कीम अंतर्गत ठेवीदारांच्या ठेवी, पूर्णपणे सुरक्षित.
४० वर्षे ग्राहकांच्या विश्वासाची!



फॉर्मिंग (1 ग्रॅम) मधील व आकर्षक फॅशन ज्वेलरीमध्ये
गंठन, राणीहार, नेकलेस, बांगड्या, टॉप्स, बिंदी, साडीपीन मधील असंख्य व्हरायटी रू. 999/- पासुन सुरु
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी.
22 कॅरेट सोन्याच्या दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹888/-


## ‘नगर अर्बन बँक घोटाळ्या’त संचालक, कर्जदारांच्या ७२ मालमत्ता जप्त; शासनाच्या राजपत्रात झाली नावे प्रसिध्द, बँक बचाव समितीची माहिती


नगर अर्बन बँक बचाव समितीच्या पत्रकार परिषदेत बोलताना सदस्य.

नगर – नगर अर्बन बँक घोटाळ्यातील आरोपी चेअरमन, संचालक, वरिष्ठ अधिकारी आणि काही मोठ्या कर्जदारांच्या मालमत्ता जप्त करण्याचा शासनाचा निर्णय घेतला आहे. सुमारे ७२ मालमत्ता जप्त करण्यात येणार आहेत, अशी बँक बचाव समितीचे राजेंद्र गांधी, राजेंद्र चोपडा, ॲड. अच्युत पिंगळे, डी. एम. कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी मनोज गुंदेचा उपस्थित होते.

समितीने सांगितले की, आतापर्यंत ठेवीदारांना सुमारे ७० टक्के रक्कम परत मिळाली आहे. उर्वरित ३० टक्क्यांपैकी १५ टक्के रक्कम एप्रिल २०२४ मध्ये देण्याची प्रक्रिया सुरू असून उर्वरित १५ टक्क्यांसाठीही लढा सुरू राहणार असल्याचे समितीने स्पष्ट केले आहे. त्याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने १८ मार्च २०२४ रोजी अधिसूचना काढून संबंधित आरोपी, संचालक, अधिकारी व काही कर्जदारांच्या मालमत्ता जप्त करण्याचे आदेश दिले आहेत. जप्त करण्यात येणाऱ्या मालमत्तांची एकूण किंमत कोट्यवधी रुपयांपेक्षा अधिक असल्याचा अंदाज आहे. या कारवाईतून ठेवीदारांचे पैसे, व्याज, बँकेचा निधी, सभासदांचा लाभांश तसेच कर्मचाऱ्यांचे भविष्य सुरक्षित करण्याचा प्रयत्न होणार आहे.

तसेच, संबंधित आरोपींकडून मालमत्ता विक्री करून सर्वसामान्यांची फसवणूक होऊ नये, यासाठी शासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. बँक बचाव समितीच्या प्रयत्नांमुळे ठेवीदारांना न्याय मिळत असून, ११४ वर्षांची परंपरा असलेली नगर अर्बन बँक पुन्हा सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती बँक बचाव समितीने दिली.

### यांच्या मालमत्ता सील होणार

आरोपी सुरेश शिवराम सातपुते, रमेश शिवराम सातपुते, मनोज वसुमल मोतियानी, केशव भाऊसाहेब काळे, विनोदकुमार अण्णासाहेब श्रीखंडे, अनिल चंदुलाल कोठारी, महादेव पंढरीनाथ साळवे, अजय अमृतलाल बोरा, रवींद्र विठ्ठल कडूस, सतीश विठ्ठल रोकडे, मनेष दशरथ साठे, गिरीश केदारनाथ लाहोटी, राजेंद्र केशवराव डोळे, नवनीत शांतीलाल सुरपुरिया, प्रगती देवेंद्र गांधी, सरोज दिलीप गांधी, शैलेश सुरेश मुनोत, राखी शैलेश मुनोत, दिनेश पोपटलाल कटारिया, अक्षय राजेंद्र लुनावत, केदार मुरलीधर लाहोटी, शिवदास दिलीप गायकवाड, शितल शिवदास गायकवाड, सचिन दिलीप गायकवाड, दीप्ती सुवेंद्र गांधी, देवेंद्र दिलीप गांधी, सुवेंद्र दिलीप गांधी, संदीप ईश्वरदार वाघमारे, रवींद्र विठ्ठल जेजुरकर, अशोकलाल माधवलाल कटारिया, या आरोपींची मालमत्ता सील होणार असून, त्यांच्याशी कोणीही जमिनीचा व पैशाचा व्यवहार करू नये कारण जमिनी हे महाराष्ट्र शासनाकडून जप्त करण्यात येणार आहे, असे बँक बचाओ समितीने सांगितले.

तसेच राजेंद्र बहिरू म्हस्के, आशुतोष सतीश लांडगे यांचे बँक खाते सील करण्यात आले आहे, असे समितीने सांगितले.

## कस्टमर केअर प्रतिनिधी असल्याचे भासवून ‘ऑनलाईन फसवणूक’

नगर – चुकीच्या क्रमांकावर गेलेले ६०० रुपये परत मिळवण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका तरुण अभियंत्याला सायबर चोरट्यांनी तब्बल ४० हजार रुपयांना लुटल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नालेगाव परिसरातील रहिवासी आदित्य संजय बेल्हेकर या तरुणाकडून पैसे पाठवताना मोबाईल क्रमांक चुकला होता. त्यामुळे त्याचे ६०० रुपये हरिलाल नावाच्या व्यक्तीच्या खात्यात जमा झाले. हे पैसे परत मिळवण्यासाठी आदित्यने इंटरनेटवरून ’एनपीसीआय’ कस्टमर केअरचा क्रमांक शोधला. चोरट्यांनी बनावट क्रमांकाद्वारे आदित्यशी संपर्क साधून त्याचा विश्वास संपादन केला.

बँकेचा आयएफसी कोड आणि इतर तांत्रिक माहिती घेतल्यावर, चोरट्यांनी आदित्यच्या खात्यातून ३९,९८९ रुपये परस्पर दुसऱ्या खात्यात वळवले. ही रक्कम गया येथील नितीश कुमार नावाच्या व्यक्तीच्या खात्यात जमा झाल्याचे तपासात समोर आले आहे. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच आदित्यने पोलिसांत धाव घेतली. या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी संशयित आरोपी वर गुन्हा नोंदवला असून अधिक तपास सुरू आहे. नागरिकांनी अनोळखी क्रमांकावर आपली गोपनीय माहिती देऊ नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## राहुरी, बारामती पोटनिवडणुकीमुळे नगर व पुण्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका ३१ मे पर्यंत पुढे ढकलल्या

नगर – राज्यात जाहीर झालेल्या विधानसभा पोटनिवडणुकीमुळे सहकार विभागाने अहिल्यानगर आणि पुणे जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका ३१ मे पर्यंत पुढे ढकलल्या आहेत. याबाबत सहकार विभागाने ३० मार्च रोजी यासंदर्भातील शासन आदेश जारी केला. या आदेशाच्या दिनांकापासून सध्या सहकारी संस्थांच्या निवडणुका ज्या टप्प्यावर असतील त्या टप्प्यावर ३१ मे पर्यंत लांबणीवर टाकण्यात आल्या आहेत. या आदेशातून सहकारी गृहनिर्माण संस्थांना वगळण्यात आले आहेत. यामुळे नगर जिल्ह्यातील जिल्हा बँकेसह ज्ञानेश्वर, मुळा आणि वृध्देश्वर साखर कारखान्यांची निवडणुका आता दिवाळीपर्यंत लांबवणार आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार आणि आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे अनुक्रमे बारामती, राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी २३ एप्रिल रोजी मतदान होत आहे. या पोटनिवडणुकीमुळे प्रशासनिक आणि पोलीस यंत्रणा व्यग्र राहणार आहे. त्यामुळे सहकारी संस्थांच्या निवडणुकीसाठी आवश्यक मनुष्यबळ, पोलीस बंदोबस्त, मतदान केंद्रांची उपलब्धता याबाबत अडचणी निर्माण होण्याची शक्यता असल्याचे आदेशात म्हटले आहे.

परंतु, विभागाने सहकारी संस्थांच्या निवडणुकीनंतरची पहिली पदाधिकारी निवड करणे, संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष यांच्या राजीनाम्यामुळे अन्य पदाधिकार्यांची निवड करणे, पदाधिकार्याचा राजीनामा, मृत्यूमुळे रिक्त झालेल्या जागेवर अन्य संचालकांची निवड करणे, क आणि ड वर्गातील सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया, ज्या सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेत नामनिर्देशनाचा टप्पा सुरु झाला आहे, अशा निवडणुकांना हा आदेश लागू राहणार नसल्याचे सहकार विभागाने स्पष्ट केले आहे. याबाबत ३० मार्च रोजी सायंकाळी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे सचिव अशोक गाडे यांनी स्वतंत्रपणे आदेश काढले आहेत.

नगर जिल्ह्यातील ज्ञानेश्वर, मुळा आणि वृध्देश्वर साखर कारखान्यांच्या निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी प्रसिध्द झाली होती. या यादीवर सुचना आणि हरकती घेवून येत्या १ एप्रिलाला अंतिम मतदार यादी प्रसिध्द होणार होती. मात्र, राहुरी विधानसभेच्या पोटनिवडणुकीमुळे नगर जिल्ह्यातील सहकारातील अ व ब वर्गातील संस्था आणि बँकांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत. याशिवाय ब वर्ग व क वर्गातील सोसायट्यांच्या निवडणुकाही ३१ मेपर्यंत होणार नसून त्यानंतर लगेच पावसाळा सुरू होणार आहे. पावसाळ्यात निवडणूका होत नसल्याने दिवाळीनंतर पावसाळा संपल्यावर आता जिल्हा बँकेसह ज्ञानेश्वर, मूळा आणि वृध्देश्वर साखर कारखान्यांच्या निवडणुका होणार आहेत.


DCM SHRIRAM Growing with trust
Fenesta Better by Design
भारताची नंबर 1 खिडक्यांचा आणि दरवाजांचा ब्रँड
uPVC | Aluminium | Doors | Façades
आता अहिल्यानगर (अहमदनगर) मध्ये आहे.
CHANDAN GLASS
Plot No.23, Industrial Estate, Kedgaon, Ahilyanagar-414005, Maharashtra.
Ph: 9860119223,9823189592

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## सीए अहिल्यानगर शाखा व जैन ओसवाल युवक संघातर्फे ‘एमएसएमई’ व ‘स्टार्ट अप’वर २ एप्रिलला चर्चासत्र

नगर – इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (ICAI) अहिल्यानगर शाखा व जैन ओसवाल युवक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने २ एप्रिल रोजी दुपारी ३:४५ वाजता ‘एमएसएमई’ अॅण्ड ‘स्टार्ट अप’ चे फायदे व केंद्र व राज्य सरकारकडून मिळणाऱ्या विविध सबसिडी या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर कार्यक्रम सीए भवन, नक्षत्र लॉन्स समोर, बुरूडगाव रोड, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमामध्ये महाराष्ट्र शासनामार्फत उद्योगांना देण्यात येणाऱ्या विविध सबसिडीज, ‘एमएसएमई’ व स्टार्ट–अपचे फायदे तसेच संबंधित महत्त्वपूर्ण माहिती तज्ञांकडून देण्यात येणार आहे. या प्रसंगी सीए पंकज दारा पुणे, सीए अनुज चांडक छत्रपती संभाजीनगर तसेच जिल्हा उद्योग केंद्राचे अधिकारी व तज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नरेंद्र फिरोदिया उपस्थित राहणार आहेत.

सदर कार्यक्रम अत्यंत उपयुक्त व माहितीपूर्ण असून सर्वांसाठी विनामूल्य ठेवण्यात आलेला आहे. उद्योजक, व्यावसायिक, विद्यार्थी तसेच इच्छुक नागरिकांनी या मार्गदर्शन सत्रास उपस्थित राहावे, असे आवाहन सीए अभयकुमार कटारिया (अध्यक्ष, ICAI अहिल्यानगर शाखा) व जैन ओसवाल युवक संघाचे अध्यक्ष भूषण भंडारी तसेच इतर पदाधिकाऱ्यांतर्फे करण्यात आले आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचा मीच उमेदवार

नगर – राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला असून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षातून उमेदवारीसाठी इच्छुकांमध्ये चुरस वाढत आहे. या पार्श्वभूमीवर पक्षाचे कार्यकर्ते प्रा. अमोल खाडे यांनी आपणच अधिकृत उमेदवार असल्याचा दावा केला आहे. याबाबत त्यांनी प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्याकडे औपचारिकरित्या उमेदवारीची मागणी नोंदवली आहे. पहिल्याच दिवशी नामनिर्देशन पत्र विक्री सुरू होताच खाडे यांनी चार अर्ज खरेदी करून आपल्या तयारीचे संकेत दिले.



प्रा. अमोल खाडे

प्रा. खाडे हे पक्षाचे प्रामाणिक, निष्ठावंत व दीर्घकाळ कार्यरत असलेले कार्यकर्ते असल्याचे त्यांनी सांगितले. राहुरी मतदारसंघात ओबीसी समाजाचे निर्णायक मतदान असल्याने या समाजाचे प्रतिनिधित्व करणारा सक्षम उमेदवार देण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सामान्य नागरिकांच्या समस्या, शेतकरी व युवकांचे प्रश्न यावर ठोस भूमिका घेऊन निवडणूक लढवणार आहे, असे त्यांनी सांगितले. प्रस्थापितांच्या विरोधात पूर्ण ताकदीने निवडणूक रिंगणात उतरणार असल्याचा इशाराही त्यांनी यावेळी दिला. — अधोरेखित केले. पक्षाच्या विचारांशी प्रामाणिक राहून गेली अनेक वर्षे कार्य केले आहे. त्यामुळे पक्ष नेतृत्वाने माझ्यावर विश्वास ठेवून उमेदवारी द्यावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

तसेच, प्रस्थापित राजकारणाला पर्याय देण्याची वेळ आली असून जनतेच्या प्रश्नांवर थेट लढा देण्याची तयारी असल्याचे खाडे यांनी स्पष्ट केले. सामान्य नागरिकांच्या समस्या, शेतकरी व युवकांचे प्रश्न यावर ठोस भूमिका घेऊन निवडणूक लढवणार आहे, असे त्यांनी सांगितले. प्रस्थापितांच्या विरोधात पूर्ण ताकदीने निवडणूक रिंगणात उतरणार असल्याचा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

दरम्यान, राहुरी पोटनिवडणुकीत विविध पक्षांकडून इच्छुक उमेदवार पुढे येत असल्याने निवडणुकीत चुरशीची लढत होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाकडून अधिकृत उमेदवार कोण ठरणार याकडे कार्यकर्ते आणि मतदारांचे लक्ष लागले आहे.

## राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी ईव्हीएम सरमिसळ पूर्ण

नगर – राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या आगामी पोटनिवडणुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या ईव्हीएम व व्हीव्हीपॅट मशीनची प्रथम सरमिसळ प्रक्रिया येथील जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या मार्गदर्शनाखाली हा टप्पा पूर्ण करण्यात आला. प्रथमस्तरीय तपासणी पूर्ण झालेल्या मशीनचे प्रत्यक्ष वाटप करण्यासाठी ही सरमिसळ केली जाते. भारत निवडणूक आयोगाच्या प्रणालीद्वारे विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसमोर ही प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्यात आली. यानंतर राहुरी मतदारसंघासाठी निश्चित केलेल्या मशीनच्या याद्या जिल्हा मुख्यालयात सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना दिल्या जातील.

निवडणुकीच्या कामकाजासाठी या मशीन राहुरी मतदारसंघाचे निवडणूक अधिकारी व सहाय्यक निवडणूक अधिकारी यांच्याकडे सुपूर्द केल्या जातील. राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत या सर्व मशीन राहुरी येथील स्ट्राँग रूममध्ये सुरक्षित ठेवण्यात येणार आहेत. निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची यादी अंतिम झाल्यानंतर सर्व संबंधित उमेदवारांनाही या सरमिसळ झालेल्या मशीनची यादी दिली जाईल.

## राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी मतदार ओळखपत्र नसल्यास १२ पर्यायी कागदपत्रे चालणार

नगर – आगामी २०२६ च्या राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत मतदान करण्यासाठी मतदारांकडे ’मतदार ओळखपत्र’ सोबत असणे आवश्यक आहे. मात्र, ऐनवेळी मतदानाच्या दिवशी एखाद्या मतदाराकडे ओळखपत्र उपलब्ध नसल्यास त्यांना मतदानापासून वंचित राहावे लागणार नाही. सर्व मतदारांना मतदान प्रक्रियेत विनाअडथळा सहभागी होता यावे, यासाठी निवडणूक आयोगाने मतदार ओळखपत्राव्यतिरिक्त १२ पर्यायी कागदपत्रांना पुरावा म्हणून मंजुरी दिली असून, यापैकी कोणताही एक दस्तऐवज दाखवून नागरिक आपला मतदानाचा हक्क बजावू शकतात, असे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्यावतीने कळविण्यात आले आहे.

मतदानासाठी ग्राह्य धरल्या जाणाऱ्या या १२ पर्यायी कागदपत्रांमध्ये आधार कार्ड, पॅन कार्ड, वाहनचालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), भारतीय पासपोर्ट आणि बँक किंवा पोस्ट ऑफिसचे फोटो असलेले पासबुक यांचा समावेश आहे. याशिवाय मनरेगा जॉब कार्ड, आरोग्य विमा स्मार्ट कार्ड किंवा ’आयुष्मान भारत’ कार्ड, नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टर अंतर्गत मिळालेले स्मार्ट कार्ड, तसेच फोटो असलेली पेन्शनची कागदपत्रेही चालतील. यासोबतच केंद्र किंवा राज्य सरकार आणि सरकारी कंपन्यांनी कर्मचाऱ्यांना दिलेले ओळखपत्र, खासदार–आमदारांचे अधिकृत ओळखपत्र आणि सामाजिक न्याय मंत्रालयाने दिलेले दिव्यांगत्वाचे ओळखपत्र यापैकी कोणताही एक पुरावा दाखवून मतदान करता येईल.

मतदान करताना नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी आयोगाने काही विशेष सवलती आणि नियमही स्पष्ट केले आहेत. मतदार ओळखपत्रावरील नावात स्पेलिंग मिस्टेक किंवा किरकोळ कारकुनी चुका असल्यास त्याकडे दुर्लक्ष करून मतदान करू दिले जाईल; तसेच तुमचे ओळखपत्र दुसऱ्या मतदारसंघातील अधिकाऱ्यांनी दिलेले असले, तरी तुमचे नाव राहुरीच्या मतदार यादीत असल्यास ते ग्राह्य धरले जाईल. मात्र, ओळखपत्रावरील फोटोवरून तुमची ओळख पटत नसेल, तर वरील १२ पैकी एखादा पर्यायी पुरावा दाखवणे सक्तीचे असेल.

याव्यतिरिक्त, ज्या मतदारांनी भारतीय पासपोर्टच्या आधारे मतदार यादीत नाव नोंदवले आहे, त्यांना मतदान केंद्रावर केवळ त्यांचा मूळ पासपोर्टच दाखवणे बंधनकारक असून त्यांना इतर कोणताही पुरावा वापरता येणार नाही.



श्रीपाद छिंदमवर सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय कार्यक्रमांमध्ये बंदी घालण्याचे निवेदन पोलीस उपअधीक्षक दिलीप टिपरसे यांना देण्यात आले.

## श्रीपाद छिंदमवर सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय कार्यक्रमांमध्ये बंदी घालावी

नगर – छत्रपती शिवाजी महाराजांबदल अपशब्द वापरून अपमान करणाऱ्या श्रीपाद छिंदम वर सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय कार्यक्रमांमध्ये बंदी घालावी, या मागणीचे निवेदन शिवप्रेमी कार्यकर्त्यांच्या वतीने दिनेश जोशी, निलेश बांगरे, भगवान कुर्दाने, प्रशांत हाथरूणकर, मळू गाडळकर, ज्ञानेश्वर जाधव, बदलावाले आदींनी पोलीस उपअधिक्षक दिलीप टिपरसे यांना दिले आहे.

दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, श्रीपाद छिंदमने छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केला आहे. हे शिवप्रेमी नागरिक कदापि विसरणार नसून सहनही करणार नाही. छिंदमचे हे काम जिहादी वृत्तीचे आहे. पोलीस प्रशासनाची नोटीस धुडकावून त्याने शिवजयंतीच्या कार्यक्रमाला उपस्थिती लावली. काही दिवसांपूर्वी महापालिकेच्या अर्थसंकल्पीय बैठकीतूनही नगरसेवकांनी हाकलून लावले होते. मनपा सभागृहात ज्या नगरसेवकांनी छिंदम विरोधात भूमिका त्यांना जिहादी गुंडांकडून जीवितास धोका होऊ शकतो व शहरात जातीय तेढ वाढून कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

त्यामुळे गुंड व जिहादी वृतीच्या श्रीपाद छिंदमवर प्रशासनाने सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय कार्यक्रमांमध्ये बंदी घालावी, अशी मागणी केली आहे.

## जुनी महापालिका परिसरात छापा; गांजासह शाहरुख खानला पकडले

नगर – शहरातील जुनी महानगरपालिका परिसरात अमली पदार्थ विरोधी पथकाने मोठी कारवाई केली आहे. बेकायदेशीरपणे गांजा बाळगणाऱ्या शाहरुख ऊर्फ बबलु असिफ खान (वय ३५, रा. अहिल्यानगर) याला पोलिसांनी रंगेहाथ पकडले असून, त्याच्याकडून १२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार साबीर मोहम्मद अली शेख यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. नाशिक येथील अमली पदार्थ विरोधी कार्यदलाला जुनी महानगरपालिका परिसरात एक इसम गांजा विक्रीसाठी येणार असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीवरून कोतवाली पोलीस ठाण्याचे निरीक्षक संभाजी गायकवाड, उपनिरीक्षक प्रवीण पाटील आणि नाशिकच्या पथकाने ३० मार्च रोजी दुपारी सव्वा बाराच्या सुमारास परिसरात सापळा रचला. संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या शाहरुख खान याला ताब्यात घेऊन त्याची झडती घेतली असता, त्याच्याकडे असलेल्या निळ्या रंगाच्या प्लास्टिक पिशवीत ४९६ ग्रॅम वजनाचा हिरवट रंगाचा उग्र वास असलेला गांजा मिळून आला.

नायब तहसीलदार गणेश भानवसे आणि पंचांच्या उपस्थितीत पोलिसांनी ही कारवाई केली.

याप्रकरणी आरोपी शाहरुख खान याच्याविरुद्ध अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

## चंद्रभागाबाई फुलारी यांचे अल्प आजाराने निधन

भिंगार – भिंगार सावतानगर पंपींग स्टेशन समोरील रहिवासी



श्रीमती चंद्रभागाबाई बाळासाहेब फुलारी (वय ६२) यांचे ३० मार्च रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, सुना, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. दत्तू व मच्छिंद्र फुलारी यांच्या त्या मातोश्री होत.

## जालिंदर पाचपुते यांचे अल्प आजाराने निधन

श्रीगोंदा – काष्टी (ता.श्रीगोंदा) येथील रहिवासी जालिंदर



काशिनाथ पाचपुते (वय ६१) यांचे ३१ मार्च रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर काष्टी येथील घोडनदी तिरी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या ४ भाऊ, भावजया, पत्नी, १ मुलगा, सुन, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अभिजीत पाचपुते यांचे ते वडील तर सरस्वती जनरल स्टोअर्सचे मालक पोपटराव पाचपुते यांचे बंधू होत.

## जयसिंग राळेभात यांचे अल्प आजाराने निधन

जामखेड – जामखेड येथील रहिवासी जयसिंग भगवान राळेभात



(वय ७५) यांचे ३१ मार्च रोजी पहाटे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर जामखेड तपनेश्वर रोड अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. जामखेड येथील कांदा व्यापारी विनोद, बाळू, सागर राळेभात यांचे ते वडील होत.

# अहिल्यानगरसह काही जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस

पुणे – मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात अचानक बदललेल्या हवामानामुळे वादळी पावसाला जोरदार सुरुवात झाली आहे. अनेक ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि गारपीट यामुळे नागरिकांसह शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झालं आहे. हवामान विभागाने परिस्थिती गंभीर असल्याचे सांगत राज्यातील काही जिल्ह्यांसाठी ‘ऑरेंज अलर्ट’ जारी केला आहे, तर उर्वरित भागात ‘यलो अलर्ट’ कायम ठेवण्यात आला आहे. या बदलत्या हवामानाचा सर्वाधिक परिणाम उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही भागांवर दिसून येत आहे. विशेषतः जळगाव, नाशिक आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांनाही ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून, येथेही वीजांचा कडकडाट आणि गारपिटीची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

मराठवाड्यातील परिस्थितीही काहीशी गंभीर आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी आणि हिंगोली या जिल्ह्यांमध्ये हवामान खात्याने ऑरेंज अलर्ट जाहीर केला आहे. या भागात काही ठिकाणी मोठ्या प्रमाणावर गारपीट होण्याचा अंदाज असून, याचा थेट परिणाम शेतीवर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, लातूर, नांदेड आणि इतर काही भागांत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज आहे. मात्र, ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता असल्याने या भागांनाही सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार, पुढील काही तास राज्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असणार आहेत. मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट आणि अचानक पावसाच्या सरी अनेक ठिकाणी कोसळू शकतात. त्यामुळे नागरिकांनी मोकळ्या जागेत जाणे टाळावे, झाडाखाली किंवा विजेच्या खांबाजवळ उभे राहू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. काढणीच्या उंबरठ्यावर असलेल्या पिकांना गारपिटीचा मोठा फटका बसू शकतो. त्यामुळे पिकांचे संरक्षण करण्यासाठी शक्य त्या उपाययोजना करण्याचा सल्ला कृषी तज्ज्ञांकडून दिला जात आहे.

एकूणच, उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच राज्यात वादळी पावसाचा जोर वाढला असून, हवामानातील हा अनपेक्षित बदल पुढील काही दिवस कायम राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी सतर्क राहून परिस्थितीचा अंदाज घेत आवश्यक ती खबरदारी घेणे गरजेचे आहे.

## केडगाव औद्योगिक वसाहतीत मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट

### लहान मुले, नागरिकांच्या जीविताला धोका, मनपाकडून कारवाईची मागणी

नगर – केडगाव औद्योगिक वसाहती सिमेंट गोडाऊन परिसरात सध्या मोकाट कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणात सुळसुळाट वाढला असून नागरिकांना गंभीर त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः लहान मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. परिसरात अंदाजे २० ते २५ मोकाट कुत्रे सतत फिरत असून, काही वेळा ७ ते ८ कुत्र्यांचे टोळके एकत्र फिरताना दिसत आहे.



या कुत्र्यांकडून शाळेत जाणाऱ्या लहान मुलांवर भुंकणे, पाठलाग करणे असे प्रकार वारंवार घडत आहेत. त्यामुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या कुत्र्यांमुळे कधीही हल्ला करण्याची किंवा चावा घेण्याची घटना घडू शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे. महिला वर्गालाही या समस्येचा मोठ्या प्रमाणात त्रास होत असून, सकाळ–संध्याकाळ बाहेर पडताना असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे. याबाबत महापालिकेने ठोस कारवाई करावी, तातडीने श्वान पकडण्यासाठी विशेष वाहन पाठवून मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे. तसेच या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशीही मागणी जोर धरत आहे.



## हनुमान चालिसा पाठ

**बुधवार दि. १/४/२०२६**
**रात्री ८.३० ते १०.३०**

**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**

**दक्षिणमुखी हनुमान मंदिर,** सर्जेपुरा, सर्व सेवेकरी वृंद, परदेशी परिवार ७०२०८८७४१४

**मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एम.आय.डी.सी.**

**श्री. लंकेश हरबा,** हरबा तालिम जवळ, परशुराम खुंट, लंकेश हरबा मो. ९९२११००९६५

**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ, सारडा लेन, गंजबाजार**

**तपकिर गल्ली मित्र परिवार,** तपकिर गल्ली, आडते बाजार, ९१७५०६०००८, ९०४९०३५५३३

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) नवीपेठ**

**सुरज सुभाष जाधव परिवार,** तोफखाना तरुण मंडळ, सुराणा बिल्डींग, माळ्याची चावडी, भराडगल्ली

**श्री संकट मोचन हनुमान मंडळ, श्री रामदेवरा दरबार, सारसनगर**

**लक्ष्मीकांत श्यामसुंदर हेडा,** वेदा प्राईव, साईनगर, बुरुडगाव रोड, नक्षत्र लॉन्स जवळ, ९७६६१२२२५२

## लक्ष्मीकारंजा येथे हनुमान जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम व महाप्रसाद (भंडारा)

नगर – शहरातील लक्ष्मीकारंजा परिसरातील श्री संकटमोचन मारुती मंदिरात यंदाचा हनुमान जन्मोत्सव २०२६ भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा केला जाणार आहे. या निमित्ताने विविध धार्मिक तसेच सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

३१ मार्च रोजी सायंकाळी ८:३० वाजता श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळाच्या वतीने हनुमान चालीसा पठणाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात भाविक सहभागी होऊन सामूहिक पठणाद्वारे भक्तिरसाचा अनुभव घेणार आहेत. त्याच दिवशी सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत अष्टविनायक ब्लड बँक सेंटरच्या सहकार्याने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. सामाजिक बांधिलकी जपत या उपक्रमातून गरजू रुग्णांना मदत करण्याचा हेतू असून नागरिकांनी रक्तदानासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. २ एप्रिल रोजी पहाटे ५:४० वाजता श्री मारुती जन्मोत्सवाचा मुख्य सोहळा पार पडणार असून, त्यानंतर सकाळी ११:३० वाजता महाआरती व भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

## दोन चिमुकल्यांना आमिष दाखवून छेडछाड करणाऱ्या तरुणाला नागरिकांनी पकडले; ‘कोतवाली’त गुन्हा दाखल

नगर – आनंदीबाजार परिसरात दोन अल्पवयीन मुलींना चॉकलेट आणि पैशांचे आमिष दाखवून त्यांच्याशी गैरकृत्य करण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका नराधमाला नागरिकांनी रंगेहात पकडून पोलिसांच्या हवाली केले. अमित सुभाष गवळी (वय २२, रा. विजयनगर, बोल्हेगाव) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत एका मुलीच्या वडिलांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांची ७ वर्षांची मुलगी आणि त्यांच्या शेजाऱ्यांची ८ वर्षांची मुलगी ३० मार्च रोजी सकाळी घरासमोर खेळत होत्या. यावेळी एका दुकानाच्या पायरीवर बसलेल्या अमित गवळी याने दोन्ही चिमुकल्यांना हाका मारून जवळ बोलावले. मी तुम्हाला चॉकलेट आणि पैसे देतो, असे आमिष दाखवून त्याने मुलींना आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न केला. घाबरलेल्या मुलींनी तातडीने घरात धाव घेऊन पालकांना हा प्रकार सांगितला.

फिर्यादींनी बाहेर येऊन पाहिले असता आरोपी तेथेच बसलेला दिसला. त्याला हटकले असता त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र फिर्यादी आणि इतर नागरिकांनी पाठलाग करून त्याला पकडले. यावेळी झालेल्या झटापटीत नागरिकांनी त्याला चांगलाच चोप दिला आणि पोलीस ठाण्यात नेले. पोलिसांनी चौकशी केली असता त्याचे नाव निष्पन्न झाले. अल्पवयीन मुलींशी गैरकृत्य करण्याच्या उद्देशाने हातवारे करून आमिष दाखवल्याप्रकरणी अमित गवळीविरुद्ध तक्रार देण्यात आली आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक के. एस. सेदवाड करत आहेत. चिमुकल्यांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळल्याची भावना परिसरात व्यक्त होत आहे.

## नवीपेठ येथील श्रीराम मंदिरात हनुमान जन्मोत्सवनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम

नगर – नवीपेठ येथील श्रीराम मंदिरात श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट वतीने हनुमान जन्मोत्सव निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ट्रस्टचे अध्यक्ष प्रितम मुथ्था व उपाध्यक्ष निखिल शेटीया यांनी दिली. यंदाचा श्रीराम जन्मोत्सव चा भक्तांचा अलोट गर्दी पाहता त्याच धर्तीवर ट्रस्ट च्या वतीने दर्शन बारीची व्यवस्थाची जय्यत तयारी करण्यात आली आहे तसेच आकर्षक फुलांची सजावट व विद्युत रोषणाई ने मंदिर परिसर पुर्ण सजविण्यात आले आहे अधिक भक्तीमय व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यासाठी मंडळाच्या वतीने विशेष तयारी करण्यात आली आहे.

२ एप्रिल रोजी पहाटे ४ वाजता हनुमान जन्मोत्सवानिमित्त प्रभु श्रीराम व हनुमानजीना जलाभिषेक, दुग्धाभिषेक व शृंगार करण्यात येणार असून सकाळी ६ वाजता हनुमान जन्म व मंगल आरती होणार आहे. त्यानंतर सामूहिक हनुमान चालीसा पठण व श्री राम जय राम जय जय राम या तारक मंत्राचा गजर करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या शेवटी प्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.

### महाप्रसादाचे आयोजन



हनुमान जन्मोत्सव निमित्ताने ट्रस्टच्या वतीने बडीसाजन मंगल कार्यालय स्टेशन रोड येथे महाप्रसादाचे आयोजन दुपारी १२ ते २ या वेळेत करण्यात आले आहे. या महाप्रसादाचा लाभ सर्व भाविक भक्तांनी घ्यावा, असे आवाहन ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

दरम्यान, होळी पौर्णिमा ते हनुमान जयंती या कालावधीत शहरातील विविध भागांत दररोज हनुमान चालीसा पठण, भजन संध्या व रामनामाचा जागर उत्साहात सुरू आहे. या उपक्रमात लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वच वयोगटातील भाविक सहभागी होत आहे. घराघरांत हनुमान भक्तीचा प्रसार व्हावा या उद्देशाने मंडळाच्या वतीने हनुमान चालीसा पुस्तिकांचे मोफत वितरण करण्यात येत आहे. तसेच सर्व धार्मिक कार्यक्रमांचा समारोप हनुमान जन्मोत्सव च्या दिवशी रात्रौ ८ ते १०:३० या वेळेत नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांच्या येथे कार्यक्रम करण्यात येणार असल्याची माहिती ट्रस्ट चे अध्यक्ष प्रितम मुथ्था व उपाध्यक्ष निखील शेटीया यांनी दिली.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### आरोग्यदायी पुदीना

या ऋतूत आपल्याला आपल्या आरोग्याची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. पुदिना हे एक हिरवे पान आहे जे खाण्यास केवळ चविष्ट नाही तर हिवाळ्यात आपल्या आरोग्यासाठी देखील खूप फायदेशीर आहे. हिवाळ्यात आपल्या आहारात पुदिन्याचा सम ावेश करण्याचे पाच आश्चर्यकारक फायदे जाणून घेऊया. हिवाळ्यात आपली रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते, ज्यामुळे आपण आजारांना बळी पडण्यास अधिक असुरक्षित बनतो. पुदिन्यामध्ये अँटीऑक्सिडंट्स आणि दाहक-विरोधी गुणधर्म भरपूर असतात, जे आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास मदत करतात. पुदिना खाल्ल्याने सर्दी, खोकला आणि फ्लू सारख्या आजारांपासून बचाव होतो. हिवाळ्यात आपले पचन अनेकदा मंदावते, ज्यामुळे बद्धकोष्ठता आणि अपचन सारख्या समस्या उद्भवू शकतात. पुदिना पचन सुधारण्यास मदत करतो. ते पोटातील गॅस आणि आम्लता कमी करते आणि पचन सुधारते. पुदिना हा सर्दी आणि फ्लूसाठी रामबाण उपाय आहे. त्यात अँटीव्हायरल आणि अँटीबॅक्टेरियल गुणधर्म आहेत, जे सर्दीची लक्षणे कमी करण्यास मदत करतात. पुदिन्याची चहा पिणे किंवा पुदिन्याची पाने चावणे घसा खवखवणे आणि खोकला कमी करण्यास मदत करू शकते.

## पाककला

### पालक कॉर्न पकोडे

**साहित्य :** दोन कप पालकाची पाने, एक कप कॉर्न, एक कप बेसन, तीन चमचे दही, एक चमचा तिखट, एक चमचा धणे पूड, एक चमचा आमसूल पावडर, एक चमचा जिरे पावडर, चवीनुसार मीठ

**कृती :** सर्वात आधी पालक बारीक चिरून घ्या. त्यानंतर पॅनमध्ये पाणी घाला. या पाण्यात चिरलेला पालक आणि कॉर्न उकळण्यासाठी ठेवा. आता पालक आणि कॉर्न उकळल्यावर गॅस बंद करा. थंड झाल्यावर मिक्सर जारमध्ये पालक आणि कॉर्न बारीक करा.आता एका खोल भांड्यात पालक आणि कॉर्न पेस्ट घाला. या पेस्टमध्ये बेसन आणि दही घाला. आता ते चांगले मिसळा. यानंतर, या पेस्टमध्ये तिखट, धणेपूड, आमसूल पावडर, जिरे आणि चवीनुसार मीठ मिसळा. तुमचे पीठ तयार आहे. आता पॅन ठेवा. त्यात तेल घाला. तेल गरम झाल्यावर, मिश्रणाचे गोल गोळे बनवा आणि ते तेलात टाका आणि दोन्ही बाजूंनी तळून घ्या. तयार पालक कॉर्न पकोडा प्लेटमध्ये काढा वर सॉस किंवा चटणी सोबत सर्व्ह करा.

## वास्तू

### बागे संबंधी...

* गार्डन वास्तुनुसार पूर्वेकडील जागा खुल्या बसण्याच्या जागेसाठी चांगले आहे.
* बागेचा मध्य भाग नेहमी मोकळा, हवादार आणि स्वच्छ ठेवा.
* उत्तर, पूर्व आणि ईशान्य येथे फुलांच्या कुंड्या ठेऊ शकतात.
* बाग गोंधळमुक्त आणि व्यवस्थित असावी.
* बागेत वास्तुनुसार उत्तर किंवा पूर्व दिशेने झोका ठेऊ शकता.

## सौंदर्य

* डोळ्यांवर काकडीचे काप ठेवल्यास त्याने त्वचेला गारवा मिळतो. डोळ्यांना शांतता मिळते. तसेच याचा फायदा काळी वर्तुळे आणि सुरकूत्या कमी करण्यासाठी देखील होतो.
* पपईचा गर देखील खूप उपयोगी आहे. यामुळे डोळे ताजेतवाने दिसतात.

## सल्ला

आलं व्हेजिटेबल ड्रॉअरमध्ये ठेवा. यात ओलाव्याचं संतुलन योग्य राहतं. असं केल्यास आलं जास्त दिवस फ्रेश राहते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. १ एप्रिल २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, चैत्र शुक्लपक्ष, उत्तरा १६।१८, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. २८ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : तुमची ऊर्जा पुन्हा मिळविण्यासाठी संपूर्ण विश्रांती घ्या कारण अशक्तपणामुळे तुमचे मन कमकुवत होते.

**वृषभ** : तुमची खरी क्षमता ओळखा. अन्यथा तुम्ही शक्ती नाही तर इच्छा गमावून बसाल. मालमत्ताविषयक कामे होतील आणि उत्तमपैकी नफा होईल.

**मिथुन** : आज तुम्ही करमणुकीत रमाल. क्रीडा प्रकार आणि मैदानावरील स्पर्धेमध्ये सहभागी व्हाल.

**कर्क** : तुमच्या हातातून पैसे हरवू देऊ नका. आजच्या दिवशी आपल्या कुंटुंबातील सदस्यांच्या गरजांवर लक्ष केंद्रीत करणे ही तुमची प्राथमिकता असेल.

**सिंह** : आपल्या आत्मविश्वासाला अपेक्षांची जोड मिळाल्यामुळे आपली स्वप्ने प्रत्यक्षात येतील.

**कन्या** : आर्थिक आघाडीवरील सुधारणा तुम्हाला महत्त्वाच्या खरेदीसाठी सोयीस्कर ठरतील.

**तूळ** : एका कठीण काळानंतर आजच्या दिवशी तुम्हाला आश्चर्याचा सुखद धक्का बसेल. तुम्ही बालपणीच्या आठवणींमध्ये रमाल.

**वृश्चिक** : सदोदित तुमच्यातील लहान मूल कार्यरत ठेवण्याची तुमची क्षमता गमावून बसलात हे तुमच्या चिंतेचे मुख्य कारण ठरेल.

**धनु** : आशावादी रहा आणि चांगल्या उजळ बाजूकडे लक्ष द्या. या प्रक्रियेत तुम्ही विनाकारण मानसिक त्रास करून घ्याल.


**मकर** : आज तुमच्याजवळील उत्तम संकल्पना आणि तुम्ही केलेल्या कृती यामुळे तुम्हाला अपनेक्षीत फायदा होईल.

**कुंभ** : आज तुम्हाला जाणीव होईल, की लग्नाच्या वेळी जी वचनं दिली होती, ती सगळी खरी होती, तुमचा/तुमची जोडीदार ही खरंच सोलमेट आहे.

**मीन** : स्वप्नील चिंता सोडून द्या आणि आपल्या रोमॅण्टीक जोडीदाराच्या सहवासाचा आनंद घ्या. आनंद, समाधान आणि व्यवसाय दोन्ही गोष्टी वेगवेगळ्या ठेवा.

## शब्दगंध क्र. ७३९९

सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :** १) निरोप; मेसेज ४) येणे ७) विशेषत: लहान मुलांना होणारा एक आजार ८) पाणी; नीर ९) गरम मसाल्यातील एक पदार्थ १२) माणसांतील श्रेष्ठ १४) अंगरखा; शर्ट वगैरे १६) एक अधिक पाव १८) एक प्रकारची दारू १९) बी पेरण्याचे एक अवजार; तिफण २०) मीलन; मिलाफ २१) डोंगर वगैरेतील खोलगट जागा किंवा कपार २२) वडील; बाप; जनक २३) गोळा झालेले; आय २५) अंगीकार; स्वीकार २६) गरीब; प्रामाणिक; नीतिमान

**उभे शब्द :** १) काळजीपूर्वक रक्षण; जतन २) भगवान; ईश्वर ३) राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सर्वोच्च नेते ४) प्रीती ५) मजल करीत करीत ६) श्रीरामाच्या वानरसेनेतील दोन प्रमुख वानरांपैकी एक १०) वेग; स्पीड ११) आतून मदत; उत्तेजन १३) चटकदार; रसाने भरलेले १५) अयोध्येचा राजा; सीतापती १७) आवडलेले; मान्य १९) वृक्ष; झाड २२) धातूचा दोरा २४) महिना; मास

### शब्दगंध क्र. ७३९८ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : तेवढच बोलत जा जेवढ लोकांना माहित असायला हवे बाकीचे मनात ठेवायचे असते.

# मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

## किडनी सुरक्षित आहे का हे कसे ओळखावे?

मूत्रपिंड शरीरातील कचरा बाहेर काढण्याचे काम करतात. शरीरातील द्रव आणि खनिज संतुलन राखण्यात, रक्तदाब नियंत्रित करण्यात आणि संपूर्ण चयापचय प्रणाली संतुलित करण्यात देखील ते महत्त्वाची भूमिका बजावतात. तथापि, आजकाल चुकीची जीवनशैली, अस्वस्थ खाण्याच्या सवयी आणि अपुरे पाणी सेवन यामुळे मूत्रपिंडाशी संबंधित आजार वाढत आहेत.

मूत्रपिंडाच्या आरोग्याबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी १२ मार्च रोजी जागतिक मूत्रपिंड दिन जगभरात साजरा केला जात आहे. या निमित्ताने, आम्ही तुम्हाला मूत्रपिंड योग्यरित्या कार्य करत आहेत की नाही हे दर्शविणारी लक्षणे सांगत आहोत.

१. शरीरावर सूज येणे

जेव्हा किडनी रक्तातील जास्तीचे सोडियम आणि पाणी बाहेर काढू शकत नाही, तेव्हा ते शरीरात साठू लागते. प्रामुख्याने पावले, घोटा आणि हातांवर सूज येते. सकाळी उठल्यावर डोळ्यांखाली फुगीरपणा जाणवणे हे किडनीच्या आजाराचे सुरुवातीचे लक्षण असू शकते.

२. लघवीमध्ये बदल होणे

किडनी थेट लघवी तयार करण्याच्या प्रक्रियेवर नियंत्रण ठेवते, त्यामुळे यात होणारे बदल महत्त्वाचे आहेत. लघवीमध्ये जास्त फेस येत असेल, तर याचा अर्थ लघवीवाटे 'अल्ब्युमिन' नावाचे प्रथिन शरीराबाहेर जात आहे. लघवीचा रंग गडद होणे, लघवीतून रक्त येणे किंवा रात्रीच्या वेळी वारंवार लघवीला जावे लागणे.

३. सतत थकवा आणि अशक्तपणा

किडनी एरिथ्रोपोयटीन नावाचे संप्रेरक तयार करते, जे लाल रक्तपेशी बनवण्यास मदत करते. किडनी निकामी होऊ लागल्यास या संप्रेरकाचे प्रमाण कमी होते, ज्यामुळे रक्ताल्पता होतो. परिणामी मेंदू आणि स्नायूंना पुरेसा ऑक्सिजन मिळत नाही आणि तुम्हाला सतत थकवा जाणवतो.

४. त्वचेला खाज सुटणे आणि कोरडेपणा

रक्तातील विषारी पदार्थ बाहेर न पडल्यामुळे ते रक्तातच साठू लागतात. रक्तातील खनिजे आणि पोषक तत्वांचे संतुलन बिघडल्यामुळे त्वचा कोरडी पडते आणि प्रचंड खाज सुटू लागते. हे रक्तातील फॉस्फरसचे प्रमाण वाढल्यामुळे होते.

वरील लक्षणे इतर किरकोळ कारणांमुळेही असू शकतात. परंतु, जर तुम्हाला ही लक्षणे वारंवार जाणवत असतील, तर क्रिएटीनिन आणि युरिया यांसारख्या रक्तचाचण्या करून डॉक्टरांचा सल्ला घेणे केव्हाही उत्तम.

मूत्रपिंड निरोगी ठेवण्यासाठी टिप्स -

मूत्रपिंडाच्या आरोग्यासाठी योग्य आहार महत्त्वाचा आहे. संतुलित आहार आणि पुरेसे पाणी सेवन केल्याने मूत्रपिंडावरील दबाव कमी होतोच, शिवाय एकूण आरोग्यही राखण्यास मदत होते.

फळे आणि भाज्या खा - फळे आणि हिरव्या भाज्या जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटिऑक्सिडंट्सने समृद्ध असतात. फळे आणि हिरव्या भाज्या खाल्ल्याने मूत्रपिंडाचे आरोग्य राखण्यास मदत होते.

पाणी - मूत्रपिंड निरोगी ठेवण्यात पाणी महत्त्वाची भूमिका बजावते. पुरेसे पाणी पिल्याने शरीरातील कचरा योग्यरित्या बाहेर पडण्यास मदत होते. यामुळे मूत्रपिंडावरील दबाव कमी होतो आणि रोगाचा धोका कमी होतो.

मीठ मर्यादित करा - जास्त मीठ सेवन केल्याने रक्तदाब वाढतो, ज्यामुळे मूत्रपिंडाचे आजार होऊ शकतात. म्हणून मीठ सेवन मर्यादित केले पाहिजे. संतुलित प्रथिने - जर तुम्ही व्यायामशाळेतील क्रियाकलापांमुळे जास्त प्रथिने सेवन केले तर यामुळे मूत्रपिंडांवर अतिरिक्त दबाव येऊ शकतो. म्हणून प्रथिने सेवन संतुलित पद्धतीने राखले पाहिजे. एकंदरीत मूत्रपिंड हे आपल्या शरीरातील एक महत्त्वाचे अवयव आहे. मूत्रपिंडाचा आजार अनेकदा लक्षणांशिवायही होऊ शकतो, म्हणून जागरूकता आणि वेळेवर निदान अत्यंत महत्त्वाचे आहे.

## पाप व पुण्य

एका गावात एक साधू राहत होता जो दिवसभर लोकांना उपदेश करत असे. त्याच गावात एक नर्तकी होती जी लोकांसमोर नाचून त्यांचे मनोरंजन करत असे.

एके दिवशी गावात पूर आला आणि दोघेही एकत्र मरण पावले. मृत्यूनंतर, जेव्हा दोघेही यमलोकात पोहोचले तेव्हा त्यांच्या कर्मांवर आणि त्यांच्यामागे लपलेल्या भावनांवर आधारित त्यांना स्वर्ग किंवा नरक मिळेल असे सांगण्यात आले. साधूला पूर्ण खात्री होती की त्याला स्वर्ग मिळेल. तर नर्तकी तिच्या मनात असे काहीही विचार करत नव्हती. नर्तकी फक्त निर्णयाची वाट पाहत होती. मग घोषणा करण्यात आली की साधूला नरक आणि नर्तकीला स्वर्ग मिळेल. हा निर्णय ऐकून साधूने रागाने यमराजावर ओरडले आणि विचारले, महाराज, हा कसला न्याय आहे? मी आयुष्यभर लोकांना उपदेश करत राहिलो आणि मला नरक मिळाला! तर ही स्त्री आयुष्यभर लोकांना खूश करण्यासाठी नाचत राहिली आणि तिला स्वर्ग दिला जात आहे. हे असे का आहे?

यमराज शांतपणे उत्तरला, ही नर्तकी पूर्वी आपला उदरनिर्वाह करण्यासाठी नाचत असे पण तिच्या मनात अशी भावना होती की ती आपली कला देवाच्या चरणी समर्पित करत आहे. तू उपदेश करत असताना, तुला वाटायचे की तुलाही त्या नर्तकीचे नृत्य पाहायला मिळाले असते तर बरे होईल!

अरे साधू! देवाचा हा महत्त्वाचा संदेश तू विसरला आहेस की एखाद्या व्यक्तीच्या कामापेक्षा काम करण्यामागील भावना जास्त महत्त्वाच्या असतात. म्हणून तुला नरक दिले जाते आणि नर्तकीला स्वर्ग दिला जातो.

तात्पर्य : आपण कोणतेही काम करतो, ते करण्यामागील हेतू स्पष्ट असला पाहिजे, अन्यथा चांगले दिसणारे काम देखील आपल्याला पुण्यऐवजी पापाचा भाग बनवेल.

# जीवन का अमृत (भाग १)



कुछ गोश्त खा लेते हैं। इस संदर्भ में, मैं आपको याद दिलाना चाहूँगा कि माँस का सेवन अवश्य ही आपकी रूहानी तरक्की में बाधा बनेगा और किसी प्रकार भी आपकी जिंदगी को बढ़ाने में सहायक नहीं होगा। दिन गिनती के हैं, एक प्रसिद्ध कहावत है। इसलिए बेकार में कर्मों का बोझ क्यों बढ़ाया जाए, जबकि आसानी से इनसे बचा जा सकता है ? अच्छा होगा, अगर आप इनसे दूर रहें। यह ज्यादा अच्छा होगा कि आप अपने दोस्तों को प्रभावित करें, बजाए इसके कि आप उनसे प्रभावित हों, क्योंकि आप कुछ ऐसी बातें जानते हैं, जिनसे वे अनजान हो सकते हैं।

### प्रेमपूर्वक व्यवहार

अतः ऐसे मौकों पर, दूसरों से प्रेमपूर्वक व्यवहार करें और निषिद्ध भोजन से परहेज रखें। इसी में आपकी भलाई है।

***

७. यह ठीक है कि शाम को आप हल्का भोजन करते हैं, क्योंकि यह ब्रह्ममुहूर्त के भजन-अभ्यास में बहुत सहायक होता है । पवित्र रास्ते पर चलने वाले अधिकतर नामलेवा शाम को बहुत हल्का भोजन लेना पसंद करते हैं, जिसे सोने से कुछ समय पहले ले लेना चाहिए।

स्वामी (शिवदयाल जी अक्सर उन लोगों के लिए रात के भोजन को छोड़ देने की जरूरत पर जोर दिया करते थे, जो पवित्र शब्द के परमानंद का सुख पाना चाहते थे । पर इस बारे में, जो आपको ज्यादा सही लगे, वह करें।

***

१. प्रार्थना जिंदगी का नमक है और हम इसके बिना जी नहीं सकते। यह इंसान की प्रकृति का हिस्सा है कि वह अपनी जो भी इच्छाएँ हैं, उनकी पूर्ति के लिए प्रार्थना करे। हममें से अधिकतर यह नहीं जानते कि वास्तव में हम किस वस्तु के लिए प्रार्थना करें, कैसे प्रार्थना करें और हम क्या करें, जिससे हमारी प्रार्थना बहुत शक्तिशाली बनकर स्वर्ग की दया को जागृत कर सके ।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नाते म्हणजे दोन आत्म्यांतील संपर्क

शिवानीदीदी : आपण जेव्हा आपल्या शरीराची काळजी घेत असतो तेव्हाही सुरुवातीला आपल्याला थोडा ताण येतोच. जर आपलं शरीर निरोगी नसेल आणि आपल्याला रोज चालण्याचा व्यायाम करायचा सल्ला मिळाला तर हा नवीन दिनक्रम सुरुवातीला आपल्याला त्रासदायक वाटेल.

सुरेश ओबेरॉय : बरोबर. आपल्याला अंगदुखीचा त्रास होईल.

शिवानीदीदी : हो, पण ती फक्त सुरुवातीचे काही दिवसच. सुरुवातीला व्यायाम न करण्यासाठी आपण खूप कारणं दाखवू आणि हा दिनक्रम पाळण्यासाठी आपल्याला खूप झगडावं लागेल.

सुरेश ओबेरॉय : आणि मग एक दिवस असा येईल की आपण चालायला जाण्यापासून स्वत:ला रोखू शकणार नाही.

शिवानीदीदी :

हे कधी होईल ?

सुरेश ओबेरॉय : जेव्हा शरीर तंदुरुस्त असेल, स्नायू लवचीक असतील आणि शरीरातील रक्तप्रवाह सुरळीत झाला असेल. अशा वेळी हवामान प्रतिकूल असलं तरीही आपल्याला चालायला जावंसं वाटेल.

शिवानीदीदी : पण ही स्थिती येईपर्यंत आपल्याला सुरुवातीला झगडावंच लागेल, नाही का? ती स्थिती किंवा तो टप्पा आपल्याला अनुभवता येईल कारण आपण आपल्या कम्फर्ट झोन (आरामदायक अवस्थे) मधून बाहेर पडायचा प्रयत्न करत असू. त्याचप्रमाणे, परिस्थितीवर आवेगात टिप्पणी करणं किंवा मत मांडणं हाच जर आपला कम्फर्ट झोन असेल आणि आता आपण पूर्ण वेळ शांत राहायचं ठरवलं तर सुरुवातीला हे नक्कीच सोपं नसेल. आपण आपल्या आत जेव्हा सकारात्मक बदल करतो तेव्हा तो आपल्या जुन्या समजुतींच्या विरुद्ध असतो. आपण स्वत:त करत असलेला हा खूप मोठा बदल असल्याने आतून थोडा दबाव येणं साहजिकच आहे.

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बराच वेळपासून पती घराबाहेर पत्नीची वाट पाहत होता..

पती : अगं... आणखी किती वेळ लावशील?

पत्नी (चिडून) : ओरडू नका, एका तासापासून सांगतेय ५ मिनिट- ५ मिनिट, समजत नाही का?

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* जगातील पहिली संपूर्णत: ग्रीन मेट्रोप्रणाली कोणती?

– दिल्ली मेट्रो

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

### पेरू

३) पिकलेल्या पेरूची भाजी करून खाता येते. तसेच पेरूचा जॅम, कोशिंबीर, चटणी, रायते व मुरांबाही करता येतो. हे सर्व पदार्थ रुचिकारक असल्यामुळे अरुची, भूक मंदावणे, आम्लपित्त या विकारांवर पेरूचे विविध प्रकार करून खावेत.

४) पेरूतील बी काढून त्याचा गर मिक्सरमध्ये बारीक करून घ्यावा व त्यात गुलाबपाकळ्या, वेलची, खडीसाखर, पाणी घालून सरबत करावे. या सरबतामधून 'क' जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात मिळत असल्याने थकवा दूर होऊन उत्साह निर्माण होतो व शरीराचा दाह कमी होतो.

५) मलावरोधाचा त्रास होत असेल, तर सलग तीन-चार दिवस पेरूचे सेवन करावे किंवा त्याची भाजी करून खावी. यामुळे आतड्यांची हालचाल वाढून घट्ट मल पुढे सरकला जातो व पोट साफ होते. ६) पेरूच्या पानांचा काढा करून त्याने गुळण्या केल्यास किंवा तो काढा थोडा वेळ तोंडात धरून ठेवल्यास दंतविकार, हिरड्यांची सूज व मुखविकार दूर होतात.

७) पेरूची पाने रुची उत्पन्न करणारी असल्याने व ग्राहीगुणधर्माची असल्याने अतिसारामध्ये पानांचा काढा करून प्यायल्यास जुलाब कमी होतात. तसेच वारंवार पोटात मुरडा येऊन जुलाब झाल्यास गुद्यभ्रंश होतो, तेव्हा पेरूच्या पानांचे पोटीस बनवून गुदभागी बांधल्याने गुद्यभ्रंश दूर होतो व तेथील सूज कमी होते.

८) स्त्रियांमध्ये आढळणाऱ्या श्वेतप्रदर या आजारावर पेरूच्या कोवळ्या पानांचा काढा करून प्यावा. वारंवार प्रसूती होऊन जर योनिभ्रंश झालेला असेल, तर या काढ्यामुळे तेथील ढिले पडलेले स्नायू आकुंचित होतात. **(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# रक्तदानासारख्या लोकउपयोगी, पुण्यकर्मी उपक्रमास 'मर्चन्ट बँके'चे सातत्यपूर्ण सहकार्य : हस्तीमल मुनोत

### हस्तीमल मुनोत यांचे प्रतिपादन



जैनाचार्य आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या पुण्यस्मृती दिनानिमित्त श्री तिलोकरत्न जैन स्थानकवासी जैन धार्मिक परीक्षा बोर्ड, आनंदसेवा मानव सेवा केंद्र यांच्या विद्यमाने व अहमदनगर मर्चन्ट को.ऑप.बँकेच्या सहकार्याने 'महारक्तदान 'शिबिराचे उद्घाटन मर्चन्ट बँकेचे चेअरमन हस्तीमल मुनोत यांच्या हस्ते करण्यात आले.

नगर – आचार्य आनंदऋषीजी महाराजांच्या 'मानवसेवा हीच ईश्वर सेवा' याला अनुसरूनच अश्या सामाजिक, लोकउपयोगी, पुण्यकर्मी उपक्रमास मर्चन्ट बँक शिबिराच्या सुरवातीपासून (३४ वर्षांपासून) सातत्याने सहकार्य करत असून असेच सहकार्य कायम राहील अशी ग्वाही देऊन मर्चन्ट बँकेचे चेअरमन हस्तीमल मुनोत यांनी रक्दात्यांचे आभार मानले.

महाशिबिराचे ३४ वे वर्ष जैनाचार्य आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या पुण्यस्मृती दिनानिमित्त श्री तिलोकरत्न जैन स्थानकवासी जैन धार्मिक परीक्षा बोर्ड, आनंदसेवा मानव सेवा केंद्र यांच्या विद्यमाने व अहमदनगर मर्चन्ट को.ऑप.बँकेच्या सहकार्याने भक्त निवास येथे 'महारक्तदान 'शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उदघाटन मर्चन्ट बँकेचे चेअरमन हस्तीमल मुनोत यांच्या हस्ते आनंदऋषीजी महाराज यांच्या प्रतिमेस चंदनाचा पुष्पहार अर्पण करून करण्यात आला.

शिबिराच्या प्रारंभी अलोऋषीजी म.सा.यांनी या स्तुत्य उपक्रमासाठी मंगलपाठ दिला. याप्रसंगी धार्मिक परीक्षा बोर्ड चे अध्यक्ष नेमीचंद चोपडा, कांतीलाल दुगड, मर्चंट्स चे व्हॉ.चेअरमन अमित मुथा, नगरसेवक प्रकाश भागानगरे, श्रीमती मीनाताई मुनोत, आयोजक मानव सेवा समितीचे आनंदराम मुनोत, सेक्रेटरी डॉ. विजय भंडारी, मर्चन्ट बँकेचे संचालक अनिल पोखर्णा, किशोर गांधी, सी.ए.मोहन बरमेचा, संजय चोपडा, किशोर मुनोत, संजय बोरा, सी.ए.अजय मुथा, संजीव गांधी, विजय कोथिबिरे, सुभाष बायड, बडीसाजन ओसवाल महासंघाचे अध्यक्ष पेमराज बोथरा, ॲड.शरद पल्लोड, बँकेचे अतिरिक्त मुख्य.कार्य, अधिकारी नितीन भंडारी, कर्मचारी प्रतिनिधी प्रसाद गांधी, जितेंद्र बोरा, मानव सेवा समितीचे रमेश पितळे, गौतम बोरा, अतुल बोरा, डॉ.रसिक मुथा, शिवाजी आव्हाड, डॉ.विजय पितळे, आनंदऋषीजी ब्लड बँकेचे गणेश कांकरिया, अशोक कोठारी, डॉ.प्रकाश कांकरिया, डॉ.सुधा कांकरिया, सागर गांधी उपस्थित होते.

शिबिराच्या प्रारंभी डॉ. विजय भंडारी यांनी उपस्थितांचे स्वागत करून या महारक्तदान शिबिराचे यंदाचे ३४ वे वर्ष असून या पुण्यकर्माच्या, मानवसेवेच्या शिबिरात आजपर्यंत २५ हजार पुरुष व ७,५०० महिलांनी सहभाग नोंदवून या महान कार्यात आपले योगदान दिले आहे. मर्चन्ट बँकेनेही सातत्याने या उपक्रमास सातत्याने पाठबळ दिल्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले.

मर्चन्ट बँकेचे चेअरमन हस्तीमल मुनोत बोलताना म्हणाले कि आचार्य आनंदऋषीजी महाराजांच्या 'मानवसेवा हीच ईश्वर सेवा' याला अनुसरूनच अश्या सामाजिक, लोकउपयोगी, पुण्यकर्मी उपक्रमास मर्चन्ट बँक शिबिराच्या सुरवातीपासून (३४ वर्षांपासून) सातत्याने सहकार्य करत असून असेच सहकार्य कायम राहील अशी ग्वाही देऊन रक्दात्यांचे आभार मानले.

नेमीचंदजी चोपडा यांनी महा रक्तदान शिबिराच्या सातत्यपूर्ण आयोजनाचे कोतुक केले. राज्यामध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात अश्या रक्तदान शिबिरातील महिलांचाही सहभाग वाखण्याजोगा असून हे निश्चितच विक्रमी असे शिबिरच म्हणावे लागेल हजारो लाखोरुग्णाच्या जीवनात नवसंजिवनी देणारे हे शिबीर अनुकरणीय व अभिनंदनीय असे आहे. या संस्थेच्या पुढील कार्यास मी सुयश चिंतितो.

आनंदराम मुनोत यांनी आभार मानले. या महारक्तदान शिबिरात १५९३ बंधु – भगिनिंनी रक्तदान केले.

# प्रेरणादायी अक्षरधन

### गाडगेबाबा तुकोबांची गाथा

"मुसाफिर" वाचनीय संग्रहणीय अक्षर धन

संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी चैतन्य पालवी डॉ. रामचंद्र देखणे 'चपराक' प्रकाशित ललित चिंतन

गाडगेबाबांचा लोकसंपर्क प्रचंड होता. कीर्तनाच्या माध्यमातून ते संपूर्ण महाराष्ट्रभर फिरत होते. गावोगावी जात होते. सामान्य माणसांशी हितगुज करीत होते. बहुजन समाजाशी संपर्क साधत होते. बहुजनांशी बाबांचा जेवढा संपर्क होता तेवढी समाजातील मान्यवर व्यक्तिंशीही त्यांची जवळिक होती. एकाच वेळी बहुजन आणि महाजन यांच्याशी संपर्क ठेवून दोघांनाही आपले आपले वाटणारे बाबांचे व्यक्तिमत्त्व होते. समाजातील राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक, साहित्यिक क्षेत्रातील अनेक मान्यवर मंडळी बाबांच्या कार्याने प्रभावित झाली होती. त्यात मुंबई राज्याचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आचार्य अत्रे, पंजाबराव देशमुख, फलटणचे राजे निंबाळकर, गणपतराव तपासे, प्रबोधनकार ठाकरे, झुणका भाकर सत्यनारायणाचे प्रणेते समतानंद गद्रे, दानशूर बंडो गोपाळ मुकादम, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

बाळासाहेब खेर मुंबई राज्याचे मुख्यमंत्री होते. बाबांनी केलेली सूचना अंमलात आणण्यासाठी बाळासाहेब आटोकाट प्रयत्न करत. तरीही बाबांच्या सूचना या मौलिक आणि लोकहिताच्या असत. शासनाने तुकाराम महाराजांची गाथा काढण्यासाठी बाबांची सूचनाच कारणीभूत ठरली होती.

संत तुकाराम महाराजांविषयी बाबांच्या मनात खूपच निष्ठा होती. तुकोबांच्या अनेक अभंगांची प्रमाणे देत त्यांची कीर्तने रंगत असत. एकदा बाबांनी बाळासाहेब खेरांना सांगितले, 'इतका खर्च तुमी करता, हा इतुकासा नाई करणार? आणिक एक गोष्ट करावं लागते... कोणती?' तुकाराम महाराज सत्पुरुष, गाथा लिहून जगावर मोठा उपकार केला. सरकारातून ती गाथा काढून छापत ना? छापा आणि स्वस्त किंमतीतले गोरगरिबाहिले द्या!'

खरोखरीच तुकोबारायांची अभंगवाणी हे मराठी माणसाचे आणि महाराष्ट्राचे लोकधन आहे. गाथा घेणे सामान्य माणसाला परवडणारे नाही. आपणच स्वस्त किंमतीत गाथा काढून हे लोकधन मराठी लोकमानसाला द्यायला हवे. हे आपले कर्तव्य आहे याची जाणीव बाबांच्या दोन शब्दांनी बाळासाहेब खेरांना झाली. त्यांनी लगेचच व्यासंगी अशा पु. मं. लाड या साहेबांना बोलावले. लाडसाहेब हे बुद्धिमान कलेक्टर होते. त्यांनी अत्यंत परिश्रम करून, संशोधन करून, संत तुकाराम गाथा आणि संत तुकाराम चरित्र तयार केले आणि शासनाच्या वतीने ती दोन्ही पुस्तके अत्यंत कमी किंमतीत सामान्य माणसांना, बहुजनांना उपलब्ध झाली. तुकाराम महाराजांनी एका अभंगात म्हटले आहे,

शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन ।
शब्द वाटू धन, जन लोका।

तुकोबारायांचे शब्दधन, जनलोकांपर्यंत वाटण्याचे महान कार्य बाबांच्या मौलिक सूचनेमुळे पूर्ण होऊ शकले. हे मराठी सारस्वताच्या क्षेत्रात बाबांचे मोठे उपकार आहेत, हे मान्य करावेच लागेल.

**– किशोर गांधी**

# राज्यस्तरीय मराठी प्राविण्य परीक्षेत जय बजरंग प्राथमिक विद्यालयाचे २५ विद्यार्थी गुणवत्ता यादीत



राज्यस्तरीय मराठी प्राविण्य परीक्षेत गुणवत्ता यादीत आलेले जय बजरंग प्राथमिक विद्यालयाचे विद्यार्थी.

नगर – आशा एज्युकेशन फाउंडेशन संचलित जय बजरंग प्राथमिक विद्यालय, पाईपलाईन रोड, अहिल्यानगर येथील प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी मराठी राजभाषा संवर्धन संचलित, राज्यस्तरीय प्राविण्य परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेत विद्यालयातील तब्बल २५ विद्यार्थी राज्य, जिल्हा तसेच केंद्रीय गुणवत्ता यादीत झळकले असून विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा त्यांनी उमटवला आहे.

राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत चमकणारे तारे : इयत्ता पहिली : १) आडसरे श्रीनिधी गणेश – १०० पैकी ९० गुण (राज्यात द्वितीय), २) अनारसे कादंबरी योगेश – १०० पैकी ८८ गुण (राज्यात तृतीय)

इयत्ता दुसरी : १) घुले ईशान दीपक – १०० पैकी ९८ गुण (राज्यात द्वितीय)

इयत्ता सहावी : १) क्षीरसागर सिद्धेश अमोल – ३०० पैकी २७४ गुण (राज्यात द्वितीय)

जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीतील यशस्वी विद्यार्थी : इयत्ता पहिली : १) परळकर अनिरुद्ध अक्षय – १०० पैकी ८० गुण (जिल्ह्यात प्रथम), २) आहेर नियती वैभव – १०० पैकी ७८ गुण (जिल्ह्यात द्वितीय)

इयत्ता दुसरी : १) आव्हाड अंजली रवींद्र – १०० पैकी ८८ गुण (जिल्ह्यात द्वितीय), २) आव्हाड स्वरा रवींद्र – १०० पैकी ८४ गुण (जिल्ह्यात चतुर्थ)

इयत्ता सातवी : १) कुशवाह अभिषेक प्रभाशंकर – ३०० पैकी २५२ गुण (जिल्ह्यात प्रथम), २) उबाळे पियुष बाळासाहेब – ३०० पैकी २४४ गुण (जिल्ह्यात चतुर्थ)

केंद्रस्तरीय गुणवत्ता यादीत झळकलेले विद्यार्थी : इयत्ता पहिली : १) गुंजाळ युग अनिल – १०० पैकी ५८ गुण (केंद्रात चतुर्थ), २) विश्वकर्मा तानिया जितेंद्र – १०० पैकी ५६ गुण (केंद्रात पंचम), ३) बरबडे कृष्णप्रिया प्रवीण – १०० पैकी ५६ गुण (केंद्रात पंचम)

इयत्ता दुसरी : १) वारे प्रथमेश अशोक – १०० पैकी ७२ गुण (केंद्रात पंचम),

इयत्ता तिसरी : १) घुले दर्शन गणेश – २०० पैकी १६० गुण (केंद्रात द्वितीय)

इयत्ता चौथी : १) बरबडे प्रेरणा प्रवीण – २०० पैकी १६० गुण (केंद्रात तृतीय)

इयत्ता पाचवी : १) आडसरे श्रीलेखा गणेश – ३०० पैकी २३८ गुण (केंद्रात द्वितीय), २) कुलकर्णी आयुष अमृत – ३०० पैकी २१४ गुण (केंद्रात तृतीय), ३) ठोकळ आरोही शंकर – ३०० पैकी २१० गुण (केंद्रात चतुर्थ), ४) मेहेत्रे कृष्णा कैलास – ३०० पैकी २१० गुण (केंद्रात चतुर्थ), ५) पवार शिवानी प्रवीण – ३०० पैकी २०८ गुण (केंद्रात पंचम)

इयत्ता सहावी : १) क्षीरसागर आदेश अमोल – ३०० पैकी २३८ गुण (केंद्रात प्रथम), २) भवार श्रद्धा तुकाराम – ३०० पैकी २२८ गुण (केंद्रात द्वितीय), ३) भोसले श्रीराज गणेश – ३०० पैकी २२२ गुण (केंद्रात तृतीय), ४) पवार साक्षी कृष्णा – ३०० पैकी २१२ गुण (केंद्रात चतुर्थ)

या यशस्वी विद्यार्थ्यांचे आशा एज्युकेशन फाउंडेशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, सहसचिव उमेश गांधी, व्यवस्थापक आशुतोष घाणेकर, सहव्यवस्थापक अमोल तोडकर यांनी अभिनंदन केले. तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत शिक्षक व पालकांचेही कौतुक केले.

या यशामागे विद्यालयातील मराठी विषय शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले असून, श्रीमती सुरेखा दुधाडे, आशा घुले, कल्पना मिसाळ, छाया क्षीरसागर व राहुल मोरे यांनी विद्यार्थ्यांना योग्य दिशा दिली.

या यशामुळे जय बजरंग प्राथमिक विद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात आपली उज्वल परंपरा कायम राखत पुन्हा एकदा आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे.

### ओम सुप्रभात ग्रुपच्या

# अध्यक्षपदी अशोक गायकवाड तर सचिवपदी नवनाथ कुऱ्हे





नगर – बालिकाश्रम रोड परिसरातील ओम सुप्रभात ग्रुपच्या अध्यक्षपदी निवृत्त बँक अधिकारी ॲड. अशोक गायकवाड यांची तर सचिवपदी नवनाथ कुऱ्हे यांची निवड झाली.

रविवारी झालेल्या बैठकीत एकमताने निवड करण्यात आली. बालिकाश्रम रोडवरील ओम सुप्रभात ग्रुप गत सोळा वर्षापासून नागरिकांना चालण्याचे आणि आरोग्याचे महत्त्व पटवून देत आहे. सामाजिक बांधिलकी म्हणून ग्रुपतर्फे गरजूंना मदत केली जाते. ही निवड एक वर्षासाठी राहणार आहे. या बैठकीला संस्थापक अध्यक्ष अविनाश जोशी, माजी सचिव संजय मुदगल, निवृत्त कार्यकारी अभियंता जयप्रकाश संचेती, रमेश बोरुडे, गोविंद खेर्डेकर, मधुकर साबळे, ॲड. बबनराव सुंबे आदी उपस्थित होते.



कॅफेला फावोरिटा ल्यू येथे आयोजित करण्यात आलेला कॅण्डल मेकिंग वर्कशॉप पार पडला.

# कॅण्डल मेकिंग कार्यशाळेत सुंदर कल्पकतेचा आविष्कार

नगर – नगरमधील कॅफेला फावोरिटा ल्यू येथे आयोजित करण्यात आलेला कॅण्डल मेकिंग वर्कशॉप उत्साहात पार पडला. या कार्यशाळेचे मार्गदर्शन रिषिता दिवांशु मुनोत यांनी केले आणि त्यांनी अतिशय कलात्मक व नावीन्यपूर्ण पद्धतीने सहभागींना मार्गदर्शन केले.

या वर्कशॉपमध्ये सहभागीऔनी विविध प्रकारचे डेजर्ट कॅण्डल तयार केले. कपकेक कॅण्डल, आईस्ड लॅटे कॅण्डल, केक कॅण्डल, मूस कॅण्डल आणि शॅम्पेन कॅण्डल अशा अनेक आकर्षक प्रकारांमुळे कार्यशाळेला एक वेगळीच रंगत आली. प्रत्येक कॅण्डल वेगळ्या रंगात, सुगंधात आणि कल्पनेतून साकारलेली होती, ज्यातून प्रत्येकाची सर्जनशीलता सुंदरपणे दिसून आली.

रिषिता यांनी कॅण्डल मेकिंगची संपूर्ण प्रक्रिया सोप्या आणि रंजक पद्धतीने शिकवली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे प्रत्येक सहभागीला स्वतःची कॅण्डल तयार करण्याचा आत्मविश्वास मिळाला.

# जिल्ह्यातील वकील, न्यायालयीन कर्मचारी व कुटुंबीयांना आरोग्य सुरक्षा कवचासाठी बैठक

### आयुष्मान भारत व महात्मा फुले योजनांचा संयुक्त लाभ देण्याचा पुढाकार

नगर – जिल्ह्यातील वकील, न्यायालयीन कर्मचारी, न्यायाधीश तसेच त्यांच्या कुटुंबीयांना आरोग्य सुरक्षा कवच मिळावे या उद्देशाने जिल्हा न्यायालयात नुकतीच बैठक पार पडली. आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना या योजनांचा संयुक्त लाभ सर्व पात्र घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसद यांच्या वतीने पुढाकार घेण्यात आला आहे. ही बैठक प्रधान जिल्हा न्यायाधीश शिवाजीराव कचरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी आयुष्मान भारत योजनेचे जिल्हा प्रमुख डॉ. अनिकेत भालसिंग, दक्षता अधिकारी व्ही. बी. वांडेकर, टीम लीडर हर्षवर्धन साळवे, पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. कारभारी गवळी तसेच ॲड. अमित थोरात आदी उपस्थित होते.

बैठकीत एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, उत्पन्नाची कोणतीही अट न ठेवता न्यायव्यवस्थेशी संबंधित सर्व पात्र घटकांना या योजनांचा लाभ देण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. या निर्णयामुळे जिल्ह्यातील सुमारे १० हजार कुटुंबांना मोफत व कॅशलेस वैद्यकीय उपचाराची सुविधा उपलब्ध होणार आहे.

अधिकाऱ्यांनी माहिती देताना सांगितले की, या योजनांमुळे गंभीर आजारांवरील उपचार, रुग्णालयीन खर्चासाठी आर्थिक संरक्षण तसेच व्यापक आरोग्य सुरक्षा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे न्यायव्यवस्थेत कार्यरत वकील व कर्मचारी यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

यावेळी ॲड. कारभारी गवळी यांनी या उपक्रमाचे स्वागत करत, आरोग्य हा हक्क – आता संरक्षणही या संकल्पनेला बळ देणारा हा निर्णय असल्याचे सांगितले. समाजातील सेवाभावी घटकांसाठी ही योजना आरोग्य सुरक्षा देणारे ऐतिहासिक पाऊल असल्याचे त्यांनी नमूद केले. न्यायव्यवस्थेतील घटकांना केवळ सेवा देण्याची जबाबदारी नसून त्यांच्या आरोग्याचीही खात्री मिळणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.तसेच प्रधान जिल्हा न्यायाधीश शिवाजीराव कचरे यांनी संबंधित लाभार्थ्यांपर्यंत योजनांची माहिती प्रभावीपणे पोहोचविण्याचे आश्वासन दिले.



जिल्हा माहिती कार्यालय शिपाई श्रीमती चिंतादेवी जयस्वार सेवानिवृत्त झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

# जिल्हा माहिती कार्यालयातील चिंतादेवी जयस्वार सेवानिवृत्त

नगर – जिल्हा माहिती कार्यालय, अहिल्यानगर येथे कार्यरत शिपाई श्रीमती चिंतादेवी जयस्वार नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्या. त्यांच्या ३५ वर्षाच्या प्रदीर्घ व समर्पित सेवेनिमित्त कार्यालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी त्यांना स्नेहपूर्ण निरोप देत त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील यांच्या हस्ते श्रीमती जयस्वार यांचा शाल, श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी माहिती अधिकारी अमोल महाजन, वरिष्ठ लिपीक संतोष गुजर, लिपीक आयुष बाळदे, तुषार पाटील, कॅमेरामन धनंजय जगताप, वाहन चालक प्रविण मुठे, जिल्हा कोषागार कार्यालयातील पुष्पा देवकर, मीरा कोल्हे, संगिता निमोणकर तसेच प्रदीप जयस्वार, सरिता जयस्वार, गणेश जयस्वर, आयुष जयस्वार, अक्षदा जयस्वार आदी उपस्थित होते.

यावेळी श्री. पाटील म्हणाले, श्रीमती जयस्वार यांनी आपल्या सेवाकाळात प्रामाणिकपणा, शिस्त व कर्तव्यदक्षता यांचे उत्तम उदाहरण घालून दिले. कार्यालयातील प्रत्येक काम त्यांनी जबाबदारीने व तत्परतेने पार पाडले. कार्यालयास त्यांची उणिव निश्चित जाणवेल, त्यांचे सेवा निवृत्तीनंतरचे आयुष्य आरोग्यमय व समाधानकारक जावे, अशी सदिच्छाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

निरोप समारंभात सहकारी कर्मचाऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, श्रीमती जयस्वार यांचा स्वभाव अत्यंत मनमिळाऊ, सहकार्यशील व कष्टाळू होता. त्यांनी नेहमीच सर्वांना सहकार्य केले. त्यांच्या सेवानिवृत्तीमुळे कार्यालयात एक जिव्हाळ्याची उणीव जाणवेल, अशा भावना व्यक्त करण्यात आल्या. यावेळी श्रीमती जयस्वार यांनीही आपल्या सेवाकाळातील अनुभव सांगताना अधिकारी व सहकाऱ्यांचे आभार मानले. कार्यालयाकडून मिळालेल्या सहकार्यामुळेच आपण आपली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडू शकलो, असे त्यांनी नमूद केले.

# माळीवाडा येथील गणेश मंडळांचा फुले दांपत्य स्मारक समितीला पाठिंबा



फुले दांपत्य स्मारक समितीला पाठिंब्याचे पत्र किशोर डागवाले यांच्याकडे सुपूर्द करताना गणेश मंडळांचे पदाधिकारी. यावेळी ज्ञानेश्वर रासकर, छगुनाना जाधव, बजरंग भुतारे, विष्णुपंत म्हस्के, संग्राम रासकर, अशोक आगरकर, राजेंद्र ताठे, प्रकाश इवळे, भास्कर चौधरी, सुरेश कावळे, जालिंदर बोरुडे, सुधीर पुंड, गणेश कोल्हे, मच्छिंद्र बनकर, बाबासाहेब दळवी, माळी महासंघाचे मनोज फुलसौंदर आदी उपस्थित होते.

नगर – क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकाचे भूमिपूजन होऊन आठ महिने उलटूनही प्रत्यक्ष कामास सुरुवात झालेली नाही. माळीवाडा परिसरातील अतिक्रमणे तसेच माळीवाडा वेशीतील अपुरी जागा यामुळे स्मारकाच्या कामात अडथळे निर्माण होत आहेत. या पार्श्वभूमीवर शहरातील फुले प्रेमी दहा गणेश मंडळांनी समितीला पाठिंबा दर्शविला आहे. याशिवाय याशिवाय सकल मराठा समाज, सकल कैकाडी समाज, पद्मशाली समाज, साळी समाज, कासार समाज आदी विविध समाजबांधवांचा मोठा पाठिंबा मिळत आहे. महानगरपालिकेच्या सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचा पूर्णाकृती पुतळा उभारून भव्य–दिव्य स्मारक साकारले जाईल, असा विश्वास समितीचे किशोर डागवाले यांनी व्यक्त केला.

फुले दांपत्य स्मारक समितीला विविध स्तरातून पाठिंबा वाढत आहे. तसेच समितीने माळीवाडा वेस पाडण्यासाठी महानगरपालिकेत विशेष सभा घेण्याची मागणी केली आहे. दरम्यान, स्मारक उभारणीसाठी तसेच अतिक्रमणे हटवून माळीवाडा वेस पाडण्याच्या मागणीसाठी परिसरातील तरुण मंडळांनी पाठिंबा पत्र दिले. यावेळी किशोर डागवाले, बाळासाहेब भुजबळ, विनोद पुंड, अमोल भांबरकर, राजेंद्र पडोळे, श्री विशाल गणपती देवस्थानचे विश्वस्त प्रा. माणिक विधाते, पंडितराव खरपुडे, ज्ञानेश्वर रासकर, छगुनाना जाधव, बजरंग भुतारे, विष्णुपंत म्हस्के, संग्राम रासकर, अशोक आगरकर, राजेंद्र ताठे, प्रकाश इवळे, भास्कर चौधरी, सुरेश कावळे, जालिंदर बोरुडे, सुधीर पुंड, गणेश कोल्हे, मच्छिंद्र बनकर, बाबासाहेब दळवी, माळी महासंघाचे मनोज फुलसौंदर, दिनेश कापरे, नंदकुमार नेमाने, गणेश धाडगे, अमोल रासकर, रोहित पठारे, मळु गाडळकर, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे महानगर अध्यक्ष ब्रिजेश ताठे, फुले ब्रिगेडचे अध्यक्ष दिपक खेडकर, रोहन डागवाले, अनिल घाडगे, सतीश रासने, ज्ञानदेव खराडे, सुहास पाथरकर, शशिकांत पवार, मयूर मैड आदींसह मोठ्या संख्येने फुले प्रेमी उपस्थित होते.

प्रा. माणिक विधाते यांनी सांगितले की, माळीवाडा वेश पूर्वी शहराचे प्रवेशद्वार म्हणून ओळखली जात होती; मात्र सध्या ती जीर्णावस्थेत असून पडझड झाली आहे. शहर महानगरात परिवर्तित झाल्याने भव्य स्मारकासाठी वेश पाडणे आवश्यक आहे. नगरसेवकांनी दिलेला पाठिंबा अभिमानास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले.

बजरंग भुतारे यांनी सांगितले की, स्मारक समितीच्या नियोजनामुळे अडचणी दूर होतील. महात्मा फुले हे सर्व समाजाचे दैवत असून त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासाठी माळीवाडा परिसरातील नागरिकांचा मोठा पाठिंबा मिळत आहे. माळीवाडा वेस पाडण्यास चार नगरसेवकांचा विरोध असल्याची खंत व्यक्त करत, परिसरातील अतिक्रमणांकडे दुर्लक्ष होत असल्याची टीकाही त्यांनी केली.

पंडितराव खरपुडे यांनीही महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे स्मारक भव्य–दिव्य असावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. माळीवाडा परिसरातील पाचही रस्त्यांवरून स्मारक दिसावे, यामुळे परिसराचे रूप पालटेल, असे त्यांनी सांगितले. बाळासाहेब भुजबळ यांनी आभार मानले.

# संतांच्या आशीर्वादाने सेवा कार्याला मिळते सातत्य

**उपमहापौर धनंजय जाधव यांचे प्रतिपादन, आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये 'दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया विनाटाका' शिबिराने मेगा शिबिराचा समारोप, महिन्याभरात ४७४७ रुग्णांची तपासणी**

नगर – कोणतेही सामाजिक कार्य करताना संतांचा आशीर्वाद लाभणे अत्यंत महत्त्वाचे असते. अशा आशीर्वादामुळेच कार्यात सातत्य आणि प्रामाणिकपणा टिकून राहतो. अहिल्यानगर ही संतांची भूमी असून, येथे अनेक संतांनी मानवतेचा संदेश दिला आहे. त्याच विचारांना पुढे नेत आनंद ऋषीजी हॉस्पिटल रुग्णसेवेचे कार्य करत आहे, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे, असे प्रतिपादन उपमहापौर धनंजय जाधव यांनी केले.



जैन सोशल फेडरेशनच्या वतीने श्री आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे आयोजित 'दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया विना टाका' या शिबिराचे उद्घाटन उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते झाले.

जैन सोशल फेडरेशनच्यावतीने श्री आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे आयोजित 'दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया विना टाका' शिबिराचे उद्घाटन धनंजय जाधव यांच्या हस्ते झाले. यावेळी संतोष बोथरा, डॉ.वसंत कटारिया, मानकचंद कटारिया, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, डॉ. आशिष भंडारी यांच्यासह तज्ञ डॉक्टर डॉ. भास्कर जाधव, डॉ. महेश घुगे, डॉ.रविंद्र मुथा उपस्थित होते

उपमहापौर जाधव पुढे म्हणाले की, गेल्या ३५ वर्षांपासून या हॉस्पिटलने अखंडितपणे रुग्णसेवा केली असून, लाखो रुग्णांना नवजीवन दिले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कमी खर्चात आणि उच्च दर्जाची सेवा देण्याचा प्रयत्न येथे होत आहे. अशा उपक्रमांमुळे समाजातील गरजू घटकांना मोठा आधार मिळत असून, भविष्यातही अशा सेवा अधिक विस्तारल्या जाव्यात, अशी अपेक्षा आहे.

प्रास्ताविकात संतोष बोथरा व डॉ. वसंत कटारिया यांनी सांगितले की, मानवसेवेच्या भावनेतून सुरू करण्यात आलेल्या या शिबिराला राज्यभरातून प्रतिसाद मिळाला. आतापर्यंत ४ हजार ७४७ रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला असून, असंख्य रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. या उपक्रमामुळे अनेकांना नवजीवन मिळाले आहे, असे त्यांनी नमूद केले. अहिल्यानगर जिल्ह्यातीलच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील रुग्ण या शिबिराची आतुरतेने वाट पाहत असतात. विविध शासकीय व सामाजिक योजनांचा लाभ रुग्णांपर्यंत पोहोचविण्याचे काम आम्ही सातत्याने करत आहोत. आचार्यांच्या प्रेरणेतून सुरू झालेल्या या सेवा उपक्रमाला समाजाचा मोठा पाठिंबा लाभत आहे, ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. तसेच या हॉस्पिटल च्या स्थापनेपासून ते आजपर्यंत डॉ. प्रकाश कांकरिया आणि डॉ. सुधा कांकरिया यांनी तन मन धनाने सदैव सहकार्य करत आले आहे यांचे कार्य अतिशय कोतुकस्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. प्रकाश कांकरिया यांनी सांगितले, रुग्णसेवा हीच आमची खरी साधना आहे. अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाचा वापर करून कमी त्रासात आणि जलद बरे होण्यास मदत करणाऱ्या शस्त्रक्रिया रुग्णांना उपलब्ध करून देणे हे आमचे ध्येय आहे. गेल्या ३५ वर्षांपासून आनंदऋषीजी हॉस्पिटलने समाजातील सर्व घटकांपर्यंत दर्जेदार आरोग्यसेवा पोहोचविण्याचा प्रयत्न केला असून, भविष्यातही ही सेवा अधिक व्यापक करण्याचा आमचा मानस आहे.

डॉ. सुधा कांकरिया म्हणाल्या, मानवी शरीर एक असले तरी त्यामध्ये अनेक अवयव कार्यरत असतात आणि त्या प्रत्येक अवयवासाठी आवश्यक अशी सर्वसमावेशक सेवा आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये उपलब्ध आहे. या सेवेच्या माध्यमातून आजपर्यंत अनेक गरजू रुग्णांना अत्यल्प दरात उपचार देण्यात आले आहेत, तर काही अत्यंत गरिब व हालाखीच्या परिस्थितीतील रुग्णांना मोफत उपचारही देण्यात आले आहेत. रुग्णांच्या या अखंड प्रवासातून हॉस्पिटलला एक वेगळीच 'आशीर्वादाची श्रीमंती' प्राप्त झाली आहे. ही श्रीमंती आर्थिक नसून रुग्णांच्या मनापासून मिळालेल्या आशीर्वादांची आहे. हे आशीर्वाद आयुष्यभर साथ देणारे असून, त्यातूनच आम्हाला अधिक जोमाने सेवा करण्याची प्रेरणा मिळते. अद्ययावत तंत्रज्ञान आणि समर्पित वैद्यकीय सेवा यांच्या जोरावर लाखो रुग्ण येथे येऊन निरोगी होतात, हीच आनंदऋषीजी हॉस्पिटलची खरी ओळख आहे. याशिवाय त्यांनी असेही नमूद केले, आरोग्य सेवा ही केवळ उपचार देण्यापुरती मर्यादित नसून ती एक सामाजिक बांधिलकी आहे. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत गुणवत्तापूर्ण आरोग्य सुविधा पोहोचविणे हे आमचे कर्तव्य आहे. यासाठी आम्ही सतत नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करत आहोत, तसेच सेवाभाव जपत रुग्णांशी मानवी नातं दृढ करण्याचा प्रयत्न करत आहोत.

डॉ. महेश घुगे यांनी शिबीरांविषयी माहिती दिली.

या शिबिरामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून रुग्णांवर विना टाका शस्त्रक्रिया करण्यात आल्या. या शिबिरामध्ये २१० रुग्नाची तपासणी करण्यात आली तसेच महिनाभर सुरु असलेल्या या शिबिराच्या माध्यमातून राज्याच्या विविध भागांतून आलेल्या रुग्णांनी या सेवांचा लाभ घेतला. उपक्रमामुळे आरोग्यसेवेचा नवा आदर्श निर्माण झाला असून, रुग्णांमध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले. आभार प्रदर्शन व सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी कांकरिया परिवार तसेचवैद्यकीय व स्वयंसेवकांचे योगदान लाभले.




सावेडी ज्येष्ठ नागरिक मंच आणि ग्राहक पंचायत महाराष्ट्र अहिल्यांनगर च्या संयुक्त विद्यमाने आयोजित अर्थसंकल्प समजून घेताना आणि मृत्युपत्र ची गरज या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. (छाया – हेमंत ढाकेफळकर)

# आर्थिक नियोजन ही काळाची गरज

**आदित्य चांदेकर यांचे प्रतिपादन; सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचातर्फे व्याख्यानाचे आयोजन**

नगर – अन्न, वस्त्र, निवारा या जशा मनुष्याच्या मूलभूत गरजा आहेत. त्याचप्रमाणे आर्थिक नियोजन ही सुद्धा काळाची मूलभूत गरज आहे. भविष्याची वाटचाल चांगल्या पद्धतीने करण्यासाठी, आज प्रत्येकाने पैशाची नियोजन योग्य पद्धतीने करणे गरजेचे आहे. आपल्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी खर्चाचे तसेच वेळेचे नियोजन असणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन आर्थिक सल्लागार व ग्राहक पंचायतीचे सदस्य आदित्य चांदेकर यांनी केले.

सावेडी जेष्ठ नागरिक मंच आणि ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अर्थसंकल्प समजून घेताना आणि मृत्युपत्रा ची गरज या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी ग्राहक पंचायत संस्थेचे अध्यक्ष गजेंद्र क्षीरसागर, कोषप्रमुख कृष्णराव बागडे, राजेंद्र कळमकर, ॲड.सिद्धार्थ वाघमारे, पंचायतचे उपाध्यक्ष दत्तात्रय सोनार, मंचचे कार्यवाहक ज्योतीताई केसकर, एस आर जोशी, बलभीम पांडव, बाजीराव जाधव, मनोहर केसकर, हरिश्चंद्र थिगळे, पुष्पा चितांबर, शिरीष कुलकर्णी, वैशाली भणगे उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले की, प्रत्येकाचे आज बँकेमधील खाते हे जॉईंट स्वरूपाचे असावे. आपल्या इच्छेने मृत्युपत्र सर्वांनी रजिस्टर पद्धतीने तयार करून ठेवावे. तसेच पेन्शनर लोकांनी आपल्या नातवंडांच्या शिक्षणासाठी पैसे योग्य तेथे गुंतवावे. राष्ट्रीयकृत बँकेत आपला आर्थिक व्यवहार असावा व त्यामध्येच आपल्या डिपॉझिट खाते असावे.

अध्यक्ष गजेंद्र क्षीरसागर म्हणाले की, ग्राहक हा देव असतो. आपण सर्वजण जन्मल्यापासून मृत्यूपर्यंत ग्राहकच असतो. बिंदू माधव जोशी यांनी ग्राहकाचे अत्यंत सोपी व्याख्या केली आहे. ग्राहक नेहमी सजग राहिला पाहिजे.

मंचच्यावतीने आदित्य चांदेकर व गजेंद्र क्षीरसागर यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शलाका रसाळ यांनी केले. पुष्पा चितांबर यांनी आभार मानले.



नगर – पुणे रोडवरील विनायकनगर परिसरातील समता कॉलनी येथे महावीर बोरा, प्रीतम चोरडिया, डॉ. महावीर गांधी यांच्या पुढाकारातून भजन संध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात हनुमान चालीसा भक्ती गीते सादर झाली. यावेळी परिसरातील नागरिक उपस्थित होते. एमआयडीसी येथील मंगल भक्त सत्संग मंडळाच्या सदस्य पवन फिरोदिया, संजय आंधळे, सुमित वर्मा, राजाभाऊ कोठारी, अनिल गुरव यांनी भजन संध्या सादर केली. भजने भक्ती गीतांनी उपस्थित मंत्रमुग्ध झाले. आरतीने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी प्रसाद वाटप करण्यात आले.

# अहिल्यानगर जिल्ह्यात पहिली महिला मापाडी कामगार म्हणून पुष्पा कदम यांचा सन्मान

नगर – कोपरगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत पहिल्या महिला मापाडी कामगार होण्याचा मान मिळवणाऱ्या श्रीमती पुष्पा सुरेश कदम यांचा अहिल्यानगर येथे स्व. शंकरराव घुले माथाडी कामगार पतसंस्थेच्या वतीने गौरव करण्यात आला. यावेळी हमाल पंचायतीचे जिल्हाध्यक्ष अविनाश घुले, तज्ञ संचालक संजय घुले, माथाडी पतसंस्थेचे चेअरमन रवींद्र भोसले, हमाल पंचायतचे उपाध्यक्ष गोविंदराव सांगळे, सचिव मधुकर केकान, पतसंस्थेचे सचिव बबनराव सुसे, संचालक आदिनाथ चेके, रतनबाई आजबे, मंदाबाई सूर्यवंशी, भैरू कोतकर, भाऊसाहेब शेळके, वाल्मिक कदम, दीपक ढोणे, रामचंद्र साळुंखे, अशोक म्हस्के, विजय अहिरे, विकास खोतकर, संतोष जाधव, शाहूल वडागळे, कैसर पठाण, विशाल साळवे, असिफ कादरी, तबाजी कारले, अर्जुन शिंदे यांच्यासह हमाल पंचायत पतसंस्थेचे कर्मचारी व सभासद उपस्थित होते.



कोपरगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत पहिल्या महिला मापाडी कामगार होण्याचा मान मिळवणाऱ्या श्रीमती पुष्पा सुरेश कदम यांचा अहिल्यानगर येथे स्व. शंकरराव घुले माथाडी कामगार पतसंस्थेच्या वतीने गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन माथाडी पतसंस्थेचे सचिव बबनराव सुसे यांनी केले. आदिनाथ चेके यांनी आभार मानले.

# शरणपूर वृद्धाश्रमात सेवाप्रीतची रामनवमी सामाजिक उपक्रमांनी साजरी

**वृद्धाश्रमात सेवा, स्नेह व आनंदाची उधळण; आजी-आजोबांसाठी किराणा, साहित्य व जीवनावश्यक वस्तूंची भेट**

नगर – शहरातील सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या वतीने नेवासा तालुक्यातील फत्तेपूर रस्त्यावर असलेल्या शरणपूर वृद्धाश्रमात रामनवमी उत्सवाचे औचित्य साधत एक आगळावेगळा आणि भावनिक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत वृद्धाश्रमातील आजी-आजोबांना महिनाभर पुरेल इतका किराणा, फर्निचर साहित्य तसेच व्हील चेअर, वॉकर यांसारख्या जीवनावश्यक वस्तू भेट देण्यात आल्या. तसेच ऋणानुबंध ग्रुपने श्रीरामची भजणे गाऊन कार्यक्रमत रंगत आणली. या उपक्रमाची संकल्पना फाउंडेशनच्या अध्यक्षा जागृती ओबेराय व प्रकल्प प्रमुख गीतांजली माळवदे यांनी साकारली. वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना सन्मानाने आणि स्नेहाने मदत करण्याचा उद्देश यामागे होता. कार्यक्रमाची सुरुवात प्रभू श्रीरामांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर वृद्धाश्रमातील आजी-आजोबांवर फुलांची वृष्टी करून त्यांना सन्मानित करण्यात आले. उपस्थितांनी वृद्धांमध्येच श्रीरामाचे रूप पाहून त्यांची सेवा करण्याचा संकल्प व्यक्त केला.

या प्रसंगी आयोजित करण्यात आलेल्या भजन संध्या कार्यक्रमाने वातावरण अधिक भक्तिमय झाले. फाउंडेशनच्या महिला सदस्यांनी सादर केलेल्या श्रीराम भक्तिगीतांनी उपस्थित सर्वांना मंत्रमुग्ध केले. त्यानंतर वृद्धाश्रमातील सर्व ज्येष्ठ नागरिकांना स्वादिष्ट मिष्टान्न भोजन देण्यात आले. या प्रेमळ आदरातिथ्यामुळे आजी-आजोबांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले.



सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या वतीने नेवासा तालुक्यातील फत्तेपूर रस्त्यावर असलेल्या शरणपूर वृद्धाश्रमात रामनवमी उत्सवाचे औचित्य साधत एक आगळावेगळा आणि भावनिक उपक्रम राबविण्यात आला.

जागृती ओबेराय यांनी प्रेम, माया आणि सेवाभाव यांचा संदेश दिला. तसेच जीवनाचे मोल समजून घेण्याचे आवाहन केले. त्या म्हणाल्या की, प्रभू श्रीराम हे केवळ देव नसून ते आदर्श जीवनाचे प्रतीक आहेत. त्यांच्या जीवनातून आपण सेवा, त्याग, कर्तव्य आणि प्रेम यांचे मूल्य शिकतो. आज आम्ही शरणपूर वृद्धाश्रमात आलो आहोत, कारण येथे राहणाऱ्या प्रत्येक आजी-आजोबांमध्ये आम्हाला श्रीरामाचेच रूप दिसते. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि समाधान हेच आमच्यासाठी सर्वात मोठे पुण्य आहे. समाजात अनेक वेळा ज्येष्ठ नागरिक एकाकी होतात, त्यांना आधाराची गरज असते. अशा वेळी आपण सर्वांनी त्यांच्याप्रती आपली जबाबदारी ओळखून त्यांना प्रेम, सन्मान आणि आधार देणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रकल्प प्रमुख गीतांजली माळवदे यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले. त्यांनी उपस्थित ज्येष्ठांना आनंदी, समाधानी आणि निरोगी राहण्याचा संदेश दिला तसेच सेवाप्रीत फाउंडेशन त्यांच्या पाठीशी कायम उभे राहील, अशी ग्वाही दिली. व त्यांनी आजोळी आल्यासारखे वाटले असे सांगितले.

या कार्यक्रमाला फाउंडेशनच्या सदस्यांमध्ये सौ. पूजा गंडाळ, सुरेखा बारस्कर, माधवी दांगट, मीरा बारस्कर, दीपाली देऊळकर, दीपा रोहिडा, पूनम आहुजा, स्मिता देशमुख, टीना राकेशकुमार, अंजली गायकवाड, देवयानी गुणे यांची उपस्थिती होती. तसेच शरणपूर वृद्धाश्रम कमिटीचे अध्यक्ष बाळासाहेब मुटकुळे, सचिव सुरेखा मगर, संपर्क प्रमुख सुधीर चव्हाण, उपसरपंच दत्तात्रय गवते, फत्तेपूरचे सरपंच बाबासाहेब शेख आणि परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.



मीराज इंटरनॅशनल स्कूल बोल्हेगाव शाखेचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात झाला.

# मीराज इंटरनॅशनल स्कूल बोल्हेगाव शाखेचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात

नगर – बोल्हेगाव येथील जगदंबा प्रतिष्ठान संचलित मीराज इंटरनॅशनल स्कूल (शाखा क्र. २) चा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात पार पडला. धर्मादाय आयुक्त निरीक्षक ज्योती सकट यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक तसेच अष्टपैलू यशाचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात शाळेतील चिमुकल्यांनी सादर केलेल्या भावपूर्ण आणि सुश्राव्य प्रार्थनेने झाली. या प्रसंगी उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून सोहळ्याचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. यावेळी संस्थेच्या संचालिका सौ. मीरा बारस्कर, नगरसेविका आशाताई कातोरे, धर्मादाय आयुक्त निरीक्षक ज्योती सकट, ह्युमन राईट्स नॅशनल ऑब्झर्व्हर सौ. शोभा कानडे, तायक्वांदो प्रशिक्षक सुरेश वाघ, बकस शिक्षिका जयश्री गाडे, उपप्राचार्या सौ. अर्चना गुंड तसेच को-ऑर्डिनेटर सौ. प्रीती शिंदे हे उपस्थित होते. सर्वांचा शाळेच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात बोलताना संचालिका सौ. मीरा बारस्कर यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नसून खेळ, संस्कार आणि व्यक्तिमत्व विकास यांची जोड अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. शाळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सातत्याने विविध उपक्रम राबवत असल्याचे त्यांनी नमूद केले.

धर्मादाय आयुक्त निरीक्षक ज्योती सकट यांनी मार्गदर्शनातून शाळेच्या उपक्रमांचे आणि पारदर्शक व्यवस्थापनाचे कौतुक करत विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणे प्रयत्न करण्याचा संदेश दिला. त्यांनी विद्यार्थ्यांना जीवनात मोठे यश मिळवण्यासाठी सातत्य, मेहनत आणि शिस्त या मूल्यांचे महत्त्व पटवून दिले.

कार्यक्रमाच्या मुख्य सत्रात वर्षभर विविध शैक्षणिक, सांस्कृतिक आणि क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. यामध्ये सानवी गाडे आणि तनिष दाताळ या विद्यार्थिनींना 'बेस्ट स्टुडंटऑफ द इयर' पुरस्कार प्रदान करून विशेष सन्मानित करण्यात आले.

विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांमध्ये मैदानी खेळांविषयी आवड निर्माण व्हावी, यासाठी शाळेच्या वतीने प्रत्येक लहान विद्यार्थ्याला बॅडमिंटन भेट देण्यात आले.

यावेळी संचालिका सौ. मीरा बारस्कर यांनी मीराज इंटरनॅशनल स्कूलच्या दोन्ही शाखांमध्ये नवीन शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्याची माहिती दिली. पालकांनी आपल्या पाल्याच्या उज्वल भविष्यासाठी लवकरात लवकर प्रवेश घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी शिक्षिका वैष्णवी बारस्कर, कोमल देशमुख, स्नेहल लासुरे, राजश्री देशमुख, अमृता गोसावी तसेच मनीषा वाखूरे आणि छाया भांड यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध कलागुणांनी उपस्थित पालक मंत्रमुग्ध झाले.

# श्रीराम नवमी निमित्त गीतरामायणाची सुरेल मैफल

**मंत्रमुग्ध संगीत, कथा आणि नृत्याचा संगम; नगरकरांनी अनुभवला रामभक्तीचा आनंद**

नगर – जय श्रीराम श्रीरामनवमीच्या पावन दिनी माऊली सभागृहात झालेल्या प्रसाद सोन्याबापू शेटे प्रस्तुत गीतरामायण या भक्तिमय सोहळ्याला रामभक्त नगरकरांचा प्रतिसाद लाभला. वेळेपूर्वीच तुडुंब भरलेलं माऊली सभागृह, कार्यक्रम सुरू झाल्यानंतर बाहेर माऊली सभागृहाच्या प्रांगणात एलईडी स्क्रीनसमोर उपस्थित भाविक नगरकर बघून हेच म्हणावसं वाटतं की आधुनिक वाल्मिकी ग. दि. माडगूळकर आणि स्वरतीर्थ सुधीर फडके यांच्या दैवी प्रतिभेतून निर्माण झालेल्या गीतरामायणाची गोडी आजही टिकून आहे.



श्रीरामनवमीच्या पावन दिनी माऊली सभागृहात झालेल्या प्रसाद सोन्याबापू शेटे प्रस्तुत गीतरामायण या भक्तिमय सोहळ्याला रामभक्त नगरकरांचा प्रतिसाद लाभला.

कवी श्रेष्ठ रवींद्रनाथांनी म्हटल्याप्रमाणे रामायण ही खरोखरच भारताच्या मौलिक भावभावनांची भागीरथी आहे. भारतीय संस्कृती रामरसात सतत भिजत आलेली आहे आणि गीत रामायण म्हणजे वाङ्मय शारदेच्या रत्नजडित मुकुटातील शिरोमणीच. याची पुनःप्रचिती यावर्षी देखील नगरकरांनी अनुभवली. गेल्या वर्षी प्रमाणे याही वर्षी श्रीराम नवमीच्या शुभ मुहूर्तावर श्री प्रसादजी शेटे यांच्या पुढाकारातून आणि मुख्य स्वरातून साकारलेल्या गीतरामायण या भक्तिमय सोहळ्याला आबाल वृद्ध नगरकरांनी प्रचंड गर्दी, उत्स्फूर्त टाळ्या आणि तोंड भरून दाद देत उदंड प्रतिसाद दिला.

गीत रामायणातील ५६ गीतांपैकी स्वये श्री रामप्रभू ऐकती, कुशलव रामायण गाती, दशरथा घे हे पायस दान, ज्येष्ठ तुझा पुत्र मला देई दशरथा, नकोस नौके परत फिरू ग, सेतू बांधा रे सागरी, भूवरी रावण वध झाला, प्रभो मज एकच वर द्यावा, गा बाळांनो श्रीरामायण यांसह निवडक २१ गाणी गायली गेलीत. गायकांचे उत्तम स्वर, वादकांची उत्तम साथ आणि सोबत रामकथेची सुयोग्य गुंफण असा त्रिवेणी संगम या मैफिलीत जुळून आला. यावर्षीच्या मैफिलीचे प्रमुख आकर्षण होते, ज्यांनी खुद्द बाबूजी अर्थात सुधीर फडके यांना गीतरामायण कार्यक्रमांमध्ये साथ केलेली आहे असे दिग्गज व्हायोलिन वादक पंडित रमाकांत जी परांजपे यांची व्हायोलिनची साथ. पुण्याचे शैलेश देशपांडे यांनी बासरी आणि संगमनेरचे सत्यजित सराफ यांनी सिंथेसायझरची साथ केली. सोबत अहिल्यानगरचे ज्येष्ठ संगीत गुरु मकरंद खरवंडीकर सर यांनी हार्मोनियमची साथ केली. तबला साथ होती हर्षद भावे आणि प्रसाद सुवर्णपाठकी यांची तर तालवाद्य साथ होती कुलदीप चव्हाण यांची.

प्रसाद शेटे यांच्यासह त्यांची कन्या सौ. श्रद्धा बाजारे शेटे आणि नगरच्या सौ. रेणुका पवार या दोघींनी सीता, कौसल्या, अहिल्या, शबरी यांच्या तोंडची गाणी सुरेल गायली. कोरस साथ होती कुमारी नेहा दरवडे आणि कुमारी गौरी पवार यांची. गायक वादकांच्या उत्तम सादरीकरणासोबतच या मैफिलीची जमेची बाजू म्हणजे सौ. वीणा दिघे यांचे रामकथेचे प्रभावी प्रगल्भ निरूपण. शेवटपर्यंत प्रेक्षकांना रामकथेमध्ये गुंतवून ठेवण्यात गायक वादक निवेदक यशस्वी ठरले.

यावर्षी गीत रामायणातील काही गाण्यांसाठी प्रसाद शेटे यांच्या स्नुषा सौ. श्रद्धा शेटे यांनी सादर केलेले कथक नृत्य हे आणखीन एक आकर्षण ठरले.

गीतरामायण कमिटीचे अध्यक्ष सुरेश चव्हाण, उपाध्यक्ष राजहंस देसाई आणि सदस्य सुभाषराव मिसाळ, राजेंद्र दासरी, बाळासाहेब परभणे, भास्कर मिसाळ आणि जयंत येलूलकर या सर्वांनी मेहनत घेतली.

प्रणव प्रसाद शेटे व पूजा प्रसाद शेटे यांनी कार्यक्रमाच्या इतर सर्व बाबी समर्थपणे सांभाळल्या. प्रसाद शेटे यांच्या गायनाने मंत्रमुग्ध झालेल्या रसिकांनी दरवर्षी या मैफिलीचे आयोजन व्हावे अशी इच्छा व्यक्त केली.

स्वीट होम चे धनेश बोगावत, रोकडोबा हनुमान मंदिरचे विश्वस्त नंदकुमार झवर, सुफी गायक पवन श्रीकांत नाईक, गुरुवर्या कोळी काकी व इतर ज्येष्ठांची उपस्थिती होती.




# संघर्ष बनला सामर्थ्याचा पाया

अचिव्हर

**सी**तामढीच्या एका तरुणाने आपल्या कठोर परिश्रमाने आणि दृढनिश्चयाने एक स्थान मिळवले आहे. ते आजच्या तरुणांसाठी एक आदर्श आहे. लोक सरकारी नोकऱ्यांच्या मागे धावतात, पण या माणसाने शून्यातून शिखरापर्यंत मजल मारून स्वतःचे साम्राज्य उभे केले आहे. ही आहे एका तांदूळ गिरणी व्यावसायिकाची कहाणी. त्याने एकेकाळी दोन हजार आणि पाच हजार रुपयांच्या कर्जावर आपल्या व्यवसायाचा पाया रचला आणि आज त्याचा व्यवसाय कोट्यवधी रुपयांची उलाढाल करतो. बिहारमधील सीतामढी जिल्ह्यातील बोखारा येथील संजय कुमार यांची ही कथा आहे. व्यावसायिक संजय कुमार यांच्या कुटुंबाची इच्छा होती, की त्यांनी नागरी सेवेत सामील होऊन प्रशासकीय अधिकारी व्हावे. घरातील संपूर्ण वातावरण त्यांना शिक्षण आणि सरकारी नोकरीकडे ढकलत होते; पण त्यांची इच्छा काहीतरी वेगळे करण्याची होती. त्यांना आपल्या आई-वडिलांच्या जवळ राहायचे होते आणि समाजाच्या व परिसराच्या विकासात योगदान द्यायचे होते. हाच विचार मनात ठेवून त्यांनी तांदूळ गिरणी उद्योगाची निवड केली. सुरुवातीला, त्यांच्या कुटुंबाने त्यांना शिक्षणाकडे परत जाण्यासाठी उद्योगात फारसा पाठिंबा दिला नाही; पण त्यांच्या दृढनिश्चयाने त्यांना आज एक यशस्वी उद्योजक बनवले आहे.


**संजय कुमार यांच्या कुटुंबाची इच्छा होती, की त्यांनी नागरी सेवेत सामील होऊन प्रशासकीय अधिकारी व्हावे. घरातील संपूर्ण वातावरण त्यांना शिक्षण आणि सरकारी नोकरीकडे ढकलत होते; पण त्यांची इच्छा काहीतरी वेगळे करण्याची होती. त्यांना आपल्या आई-वडिलांच्या जवळ राहायचे होते आणि समाजाच्या व परिसराच्या विकासात योगदान द्यायचे होते. हाच विचार मनात ठेवून त्यांनी तांदूळ गिरणी उद्योगाची निवड केली.**



संजयसमोर आपला व्यवसाय सुरू करण्याचे सर्वात मोठे आव्हान भांडवल हे होते. संजय सांगतात, की त्यांच्याकडे सुरुवातीचे मार्जिन मनी जमा करण्यासाठीसुद्धा पुरेसे पैसे नव्हते; परंतु त्यांनी हार मानली नाही आणि मित्र व नातेवाइकांकडून दोन हजार ते पाच हजार रुपये अशा लहान रकमा गोळा करून भांडवल उभे केले. त्यांच्या आई-वडिलांनी मुद्दाम आर्थिक मदत रोखून धरली, कारण त्यांना वाटत होते, की त्यांच्या मुलाने स्वतःच्या पायावर उभे राहावे आणि संघर्षातून एक अनमोल रत्न बनावे. आज तोच संघर्ष त्याच्या सामर्थ्याचा पाया बनला आहे.



# 'मेटा'चे अँटी स्कॅम फीचर




टेक्नो टॉक

**'मे**टा'ने व्हॉट्सअॅप, फेसबुक आणि मेसेंजरवर नवीन 'अॅण्टी-स्कॅम' फीचर लाँचची घोषणा केली आहे. हे फीचर संशयास्पद कृतींमध्ये गुंतण्यापूर्वी व्यक्तींना सावध करण्यासाठी आणि त्यांचे फसवणुकीपासून संरक्षण करण्यासाठी सादर करण्यात आले आहे. या नवीन अॅण्टी-स्कॅम टूल्समध्ये व्हॉट्सअॅपवर डिवाइस लिंकिंग वॉर्निंग, फेसबुकवर संशयास्पद फ्रेंड रिक्वेस्टबद्दलचे अलर्ट आणि मेसेंजरवर प्रगत स्कॅम डिटेक्शन यांसारख्या सुविधांचा समावेश आहे.

व्हॉट्सअॅप डिवाईस लिंकिंग वॉर्निंग: वर्तणुकीशी संबंधित संकेतांवरून लिंकिंग रिक्वेस्ट संशयास्पद वाटली तर व्हॉट्सअॅप आता वापरकर्त्यांना सावध करेल. स्कॅमर्स अनेकदा व्यक्तींना फसवून त्यांचे व्हॉट्सअॅप खाते दुसऱ्या डिवाईसशी जोडण्यास किंवा क्यूआर कोड स्कॅन करण्यास प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करतात. हे अलर्ट्स वापरकर्त्यांना ही विनंती नेमकी कुठून येत आहे, याची माहिती देतील आणि तो एक स्कॅम (फसवणूक) असू शकतो, असा इशारा देतील. यामुळे लिंकिंग प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वी व्यक्तींना थांबून विचार करण्याची संधी मिळेल.

संशयास्पद फ्रेंड रिक्वेस्टसाठी फ ेसबुक अलर्ट: 'मेटा' सध्या फेसबुकवर नवीन अलर्ट फीचरची चाचणी घेत आहे. तुम्ही एखाद्या संशयास्पद अकाऊंटला फ्रेंड रिक्वेस्ट पाठवता किंवा अशा अकाऊंटकडून रिक्वेस्ट येते, तेव्हा तुम्हाला इशारा दिला जाईल. यामध्ये तुमचे फारसे ओळखीचे मित्र नसलेले किंवा प्रोफाइलवर वेगळ्या देशाचे लोकेशन दिसणारे अकाऊंट्स असू शकतात. हा अलर्ट व्यक्तींना अशा संशयास्पद रिक्वेस्ट ब्लॉक किंवा नाकारण्यापूर्वी माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत करेल


मेसेंजरवर प्रगत स्कॅम डिटेक्शनचा विस्तार: मेसेंजरवरील संभाषणामध्ये बनावट नोकरीच्या ऑफर सारख्या फसवणुकीच्या सामान्य पद्धती दिसून येतील, तेव्हा वापरकर्त्यांना इशारा मिळेल आणि त्यांना ते मेसेज एआय रिव्ह्यूसाठी पाठवण्याचा पर्याय दिला जाईल. तो मेसेज स्कॅम म्हणून चिन्हांकित झाला, तर व्यक्तींना ते संशयास्पद अकाऊंट ब्लॉक किंवा तक्रार करण्यासाठी मार्गदर्शन केले जाईल.

# व्हॉट्सअॅपमध्ये पॅरेंटल कंट्रोल

अॅप वर्ल्ड


**व्हॉ**ट्सअॅपमध्ये आलेले पॅरेंटल कंट्रोल हे नवीन फीचर १३ वर्षांखालील मुलांच्या डिजिटल सुरक्षिततेसाठी मैलाचा दगड ठरणार आहे. या फीचरमुळे पालकांना आपल्या पाल्यांच्या चॅटिंगवर पूर्णपणे लक्ष ठेवता येईल. विशेष म्हणजे मुलांचे स्वतंत्र खाते असले तरी ते पालकांच्या मुख्य खात्याशी जोडलेले असेल. त्यामुळे मुलांच्या संवादावर पालकांचे नियंत्रण राहण्यास मदत होईल.

या नवीन बदलामुळे मुले कोणाशी बोलत आहेत आणि कोणत्या ग्रुपमध्ये सहभागी आहेत, हे पालकांना रिअल टाइममध्ये पाहता येणार आहे. पालकांना मुलांच्या कॉन्टॅक्ट लिस्टमध्ये नवीन व्यक्ती जोडण्याचे किंवा अनोळखी व्यक्तींना ब्लॉक करण्याचे अधिकार असतील. याम ुळे मुले सायबर गुन्हेगारी किंवा अनोळखी व्यक्तींच्या जाळ्यात अडकण्यापासून सुरक्षित राहतील. डिजिटल शिस्त लावण्यासाठी व्हॉट्सअॅपने यामध्ये वेळेचे बंधन घालण्याची सुविधाही दिली आहे.



मुले दिवसातून किती वेळ व्हॉट्सअॅप वापरू शकतात, हे पालक स्वतः ठरवू शकतील. ठराविक वेळानंतर अॅप आपोआप लॉक होईल. त्यामुळे मुलांच्या अभ्यासावर किंवा झोपेवर परिणाम होणार नाही आणि त्यांना तंत्रज्ञानाची योग्य सवय लागेल.

# भारतातील मिनी स्वित्झर्लंड



भटकंती

**चो**पटा व्हॅली हे उत्तराखंडमधील एक अत्यंत सुंदर आणि शांत ठिकाण आहे. समुद्रसपाटीपासून सुमारे २,६८० मीटर (८,७९३ फ ूट) उंचीवर वसलेली ही दरी निसर्गप्रेमी आणि ट्रेकिंगची आवड असणाऱ्यांसाठी विशेष आकर्षण आहे. उन्हाळ्यात येथे हवामान सुखद असते, तर हिवाळ्यात संपूर्ण परिसर बर्फाने आच्छादित असतो. त्यामुळे या ठिकाणाला 'भारताचे मिनी स्वित्झर्लंड' असेही म्हणतात.

ही दरी गढवाल जिल्ह्यात आहे. तिच्या सभोवतालचा भाग पाइन, देवदार आणि रोडोडेंड्रॉनच्या घनदाट जंगलांनी वेढलेले आहे. विशेष म्हणजे वसंत ऋतूत रोडोडेंड्रॉनची फुले फुलतात आणि संपूर्ण परिसर रंगांनी नटलेला दिसतो. त्यामुळे येथे येणाऱ्या पर्यटकांना निसर्गाच्या सौंदर्याचा आनंद घेता येतो. चोपटा व्हॅली हे ठिकाण चमोली जिल्ह्यात आहे आणि केदारनाथ वन्यजीव अभयारण्याचा एक घटक आहे. येथे जाण्याचा मार्गदेखील अत्यंत मनमोहक आहे. वळणदार रस्ते, पर्वतीय प्रदेश, लहान गावे आणि निसर्गरम्य दृश्ये यामुळे हा प्रवास अविस्मरणीय ठरतो.

हे ठिकाण ट्रेकिंग, कॅम्पिंग आणि पक्षी निरीक्षणासाठी प्रसिद्ध आहे. येथे हिमालयीन मोनाल पक्षी, कस्तुरी हरिण यांसारखे दुर्मिळ प्राणी आणि विविध औषधी वनस्पती सापडतात.

तुंगनाथ आणि चंद्रशिला ट्रेकचे आकर्षण

तुंगनाथ मंदिर हे जगातील सर्वात उंचावर वसलेलं भगवान शंकराचं मंदिर म्हणून ओळखलं जातं. हे मंदिर पंच केदारांपैकी एक आहे. त्यामुळे इथे अनेक भक्त दर्शनासाठी येतात. तसेच चंद्रशिला ट्रेकदेखील खूप लोकप्रिय आहे. या ट्रेकच्या शिखरावरून हिमालय पर्वतरांगांचे ३६० अंशांचे अप्रतिम दृश्य पाहायला मिळते. त्यामुळे साहस आणि निसर्गाचा आनंद एकाच ठिकाणी अनुभवता येतो. पंच केदार म्हणजे भगवान शिवाला समर्पित पाच पवित्र मंदिरे. ही मंदिरे हिमालयातील वेगवेगळ्या ठिकाणी आहेत. कथेनुसार पांडवांपासून लपण्यासाठी भगवान शिवाने बैलाचे रूप घेतले होते आणि त्यांचे शरीर वेगवेगळ्या ठिकाणी प्रकट झाले.

# 'सॉल्ट अँड पेपर' लूककडे कल

न्यू ट्रेंड्स

**आ**ज 'ग्रे हेअर' किंवा 'सॉल्ट अँड पेपर' लूक हा आत्मविश्वास, परिपक्वता आणि अभिजाततेचे प्रतीक मानला जातो. लोक आता पांढरे केस लपवण्याऐवजी स्टाइल करत आहेत. अनिल कपूर, ऋतिक रोशन, अजय देवगण, सुनील शेट्टी आणि मिलिंद सोमण यांसारख्या कलाकारांनी 'ग्रे हेअर' आत्मविश्वासाने स्वीकारले आहेत. रेड कार्पेट असो वा साधी कॅज्युअल उपस्थिती; त्यांचा 'सॉल्ट अँड पेपर' लूक नेहमीच आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरतो. वस्तुतः, ग्रे हेअर आता वृद्धत्वाचे नव्हे, तर 'एजलेस' स्टाइलचे प्रतीक बनले आहेत.

सॉल्ट अँड पेपर लूक क्लासी का वाटतो?

१. परिपक्वतेची जाणीव: काळे आणि पांढरे केस यांचे मिश्रण संतुलित आणि प्रभावी व्यक्तिम त्त्वाची छाप निर्माण करते.

२. नैसर्गिकता आणि प्रामाणिकपणा: आजच्या काळात कृत्रिमतेपेक्षा नैसर्गिकतेला अधिक महत्त्व आहे. 'ग्रे हेअर' स्वतःला स्वीकारण्याचा संदेश देतात.

३. कमी देखभाल: वारंवार रंग लावण्याची गरज राहत नाही. योग्य हेअरकट आणि स्टाइलमुळे हा लूक आपोआप उठून दिसतो.

४. धाडसी निवड: सर्वजण पांढरे केस उघडपणे स्वीकारत नाहीत. जे स्वीकारतात, त्यांच्यातील आत्मविश्वास स्पष्टपणे जाणवतो.

ग्रे हेअर स्वीकारताना काही ट्रेंडी हेअरस्टाइल्स:

१. क्लासिक शॉर्ट क्रॉप: छोटे, नीटनेटके केस ग्रे शेडमध्ये अधिक उठून दिसतात. हा लूक व्यावसायिक आणि आधुनिक दोन्ही भासतो.


२. सॉल्ट अँड पेपर अंडरकट: बाजूने हलका ट्रिम आणि वर थोडे लांब केस यामुळे ग्रे स्ट्रँड्स अधिक ठळक दिसतात.

३. टेक्स्चर्ड वेवी लूक: हलके वेवी केस नैसर्गिक ठेवून थोड्या स्टाइलिंग क्रीमने टेक्स्चर वाढवता येते. हा लूक अत्यंत आकर्षक वाटतो.

४. स्लीक बॅक स्टाइल: औपचारिक प्रसंगी केस मागे सेट केल्यास सॉल्ट अँड पेपर शेड अधिक उठून दिसतो.

५. हलकी दाढी: ट्रिम केलेल्या दाढीसोबत ग्रे केसांचा समतोल साधल्यास व्यक्तिमत्त्व अधिक प्रभावी वाटते.

'ग्रे हेअर'ची देखभाल कशी करावी?




केस कोरडे पडू नयेत यासाठी हायड्रेटिंग शॅम्पू वापरणे आवश्यक.

आठवड्यातून एकदा डीप कंडिशनिंग करणे उपयुक्त.

केस पिवळसर होऊ नयेत म्हणून पर्पल टोन शॅम्पूचा वापर करता येतो.

नियमित ट्रिमिंगमुळे लूक स्वच्छ आणि ताजातवाना राहतो.

# अतिरिक्त उष्मांक जाळण्यासाठी...



नवीन काय?

**नि**यमित व्यायाम करूनही वजनाचा काटा खाली सरकत नाही का? जीममध्ये घाम गाळून, वजनं उचलून, ट्रेडमीलवर धावून अपेक्षित निकाल मिळत नसेल तर जास्त कॅलरी खर्च करणारा, 'तीव' स्वरूपाचा व्यायाम तुम्हाला करायला हवा. भरपूर कॅलरी खर्च करणाऱ्या काही व्यायामप्रकारांविषयी...

* बहुसंख्य अॅथलिट्स दोरीच्या उड्या मारतात. या व्यायामामुळे त्यांच्या पायांना बळ मिळतं तसंच हृदयगती वाढते. कमी वेळात भरपूर कॅलरी जाळायच्या असतील तर दोरीच्या उड्या मारा. दोरीच्या उड्या मारल्याने तासाला जवळपास १०७४ कॅलरी खर्च होतात. मुख्य म्हणजे हा व्यायाम कुठेही करता येतो.

* पोहणं हा सुद्धा खूप चांगला व्यायाम आहे. जवळच्या स्वीमिंग पूलमध्ये पोहायला जा. व्यायाम म्हणून पोहल्याने तासाला साधारण ८९० कॅलरी खर्च होतात.

* जवळपास एखादी टेकडी असेल तर तिच्या पायऱ्यांवरून धावत जा. यामुळे हृदय बळकट होतं. या व्यायामाला तासाला साधारणपणे ८०० कॅलरी खर्च होतात.

* वजनं उचलण्याचा आणि ट्रेडमिलवर धावण्याचा कंटाळा येत असेल तर टेनिसची रॅकेट हातात घ्या. फावल्या वेळात टेनिस खेळा. टेनिसमध्ये जलद हालचाली कराव्या लागतात. तासभर टेनिस खेळल्याने जवळपास ७०० कॅलरी खर्च होतात.

* बास्केटबॉल आवडत असेल तर यापेक्षा उत्तम दुसरा कोणताही व्यायाम नाही. जलद हाचलालींमुळे तुम्ही बऱ्याच कॅलरी खर्च करता.

* एअरोबिक्स व्यायामप्रकार करा, एअरोबिक्सचे क्लासेसही असतात. एका तासाच्या व्यायामाने ४९० कॅलरी खर्च होतात.

* जॉगिंग हा सुद्धा कुठेही करता येण्यासारखा व्यायाम आहे. चालण्यापेक्षा जॉगिंग करा. यामुळे भरपूर कॅलरी खर्च होतात. फार जोरात न धावताही तुम्ही सहज वजन कमी करू शकता. यामुळे तासाला ७५५ कॅलरी खर्च होतील.

# अनुभव आणि पैसा कमवायचाय?

**आयआयटी हैदराबाद बी. टेक आणि एम. टेक विद्यार्थ्यांसाठी खात्रीची इंटर्नशिप सुरू करत आहे. या इंटर्नशिपमध्ये फक्त अभ्यासच नाही, तर आयआयटी हैदराबादच्या टॉप फॅकल्टीसोबत काम करण्याची संधी मिळणार आहे. नवीन तंत्रज्ञान शिकण्याची संधी आणि महिन्याला स्टायपेंडही मिळणार आहे.**

इंटर्नशिप

**आ**यआयटी हैदराबादने विद्यार्थ्यांसाठी शुअर इंटर्नशिपसाठी २५० सीट्स जाहीर केल्या आहेत. त्यात १०० सीट्स विद्यार्थिनींसाठी राखीव आहेत.

या इंटर्नशिप प्रोग्रामसाठी पुढील विद्यार्थी अर्ज करु शकतात.

१.एम एस सी किंवा चक्क फर्स्ट इयर विद्यार्थी (मॅथ्स, फिजिक्स, केमिस्ट्री, बायोलॉजी)

२.बी टेक किंवा बी डेझचे दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्षाचे विद्यार्थी

३.बी टेक, एम टेक इंटिग्रेटेड तिसऱ्या किंवा चौथ्या वर्षाचे विद्यार्थी

इंटर्नशिपसाठी निवडलेल्या विद्यार्थ्यांना मासिक स्टायपेंड मिळेल. प्रोग्राम मे ते जुलै २०२६ दरम्यान आयोजित केला जाणार आहे:

१ महिन्यासाठी: रु. ७,५००
१.५ महिन्यासाठी: रु. १०,०००
२ महिन्यांसाठी: रु. १५,०००


यासोबतच निवडलेल्या विद्यार्थ्यांना होस्टेल सुविधादेखील उपलब्ध असेल.

अर्ज करण्याची प्रक्रिया

१.'आयआयटीएच डॉट एसी डॉट इन' या अधिकृत वेबसाइटवर जाऊन अर्ज भरा.

२.अर्जाबरोबर बायोडेटा, मार्कशीट आणि टॉप २० टक्के प्रमाणपत्र अप-लोड करा.

३.अर्जाची पडताळणी झाल्यानंतर संबंधित विभाग ऑनलाइन इंटरव्ह्यू घेऊ शकतो.




# मेकॅट्रॉनिक्समधील संधी

करिअर


**ऑ**टोमेशन, आर्टिफिशियल इंटेलिजेन्स आणि अत्याधुनिक उत्पादन तंत्रज्ञानाच्या वेगाने विकसित होत असलेल्या क्षेत्रात मेकॅट्रॉनिक्स अभियांत्रिकी ही करिअरसाठी उत्तम शाखा म्हणून ओळखली जाते. मेकॅनिकल अभियांत्रिकी, इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी, इलेक्ट्रॉनिक्स, नियंत्रण प्रणाली आणि संगणक विज्ञान यांना एकत्रित करून मेकॅट्रॉनिक्स अभियंते भविष्याला आकार देणाऱ्या बुद्धिमान, स्वयंचलित प्रणाली डिझाइन विकसित करतात.

एबीबी, सीमेन्स, फानुक आणि कुका सारख्या आंतरराष्ट्रीय कंपन्या ऑटोमेशन आणि रोबोटिक्समध्ये मेकॅट्रॉनिक्स अभियंत्यांना विविध संधी देतात. उत्पादन, ऑटोमोटिव्ह, एरोस्पेस आणि आयटी क्षेत्रात लक्षणीय रोजगार उपलब्ध आहे. भारतातील ऑटोमोटिव्ह उद्योग, विशेषतः इलेक्ट्रिक वाहने वेगाने वाढत आहेत. काही वाहन कंपन्या तंत्रज्ञान, एम्बेडेड सिस्टिम्स आणि ऑटोनॉमस वाहनांमध्ये गुंतवणूक करत आहेत. बॉश वाहन इलेक्ट्रॉनिक्स आणि स्मार्ट मोबिलिटीमध्ये रोजगार निर्माण करत आहेत. आयटीमध्ये, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस आणि इन्फोसिससारख्या कंपन्या औद्योगिक इंटरनेट, एआय-आधारित ऑटोमेशन आणि डेटा-चालित उत्पादन प्रणालींसाठी अभियंते नियुक्त करतात.

मेकॅट्रॉनिक्स अभियंत्यांना स्पर्धात्मक परीक्षांद्वारे सरकारी सेवांमध्ये उच्च पदांवर पोहोचण्याचा विशिष्ट मार्ग असतो. भारतीय अंतराळ संशोधन संघटना, संरक्षण संशोधन आणि विकास संघटना आणि भारतीय रेल्वे यासारख्या मान्यताप्राप्त संस्था त्यांच्या तांत्रिक आणि संशोधन विभागांसाठी चांगल्या व्यावसायिकांचा शोध घेतात. सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम सुरक्षित रोजगार आणि स्पर्धात्मक प्रगतीसाठी चांगल्या संधी उपलब्ध होतात. साहाय्यक अभियंते, शास्त्रज्ञ आणि तांत्रिक अधिकारी यासारख्या पदांवर काम करता येते.

या गतिमान क्षेत्रात उत्कृष्टता मिळविण्यासाठी पदव्युत्तर शिक्षण घेणे महत्त्वाचे आहे. इच्छुक विद्वानांना रोबोटिक्स, ऑटोमेशन, एम्बेडेड सिस्टिम्स आणि आर्टिफिशियल इंटेलिजेंस यासारख्या अत्याधुनिक विषयांमध्ये विशेषता मि ळवण्याची संधी आहे.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मुंबई आणि मद्राससारख्या प्रसिद्ध संस्था जागतिक दर्जाचे शिक्षण आणि अत्याधुनिक संशोधन सुविधा देतात. त्यामुळे नवोपक्रम आणि विद्वत्तापूर्ण वातावरण निर्माण होते. याव्यतिरिक्त, जगभरातील आघाडीच्या देशांमध्ये प्रगत पायाभूत सुविधा आणि चांगल्या संशोधन संधींउपलब्ध आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना तांत्रिक प्रगतीच्या सीमा ओलांडण्यास अधिक सक्षम केले जाते. अशा प्रगत शिक्षणात गुंतवणूक केल्याने वैयक्तिक कौशल्य विकसित करता येते. त्याचबरोबर उद्योगातील परिवर्तनावर आधारित विकासासाठी पदवीधरांना स्थान मिळते.



नवीन पदवीधरांना सुरुवातीला समाधानकारक वेतन मिळते आणि अनुभव वाढत गेल्यानुसार उत्पन्नात लक्षणीय वाढ होते. स्वयंचलन, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि शाश्वत तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे या शाखेला दीर्घकालीन स्थैर्य आणि जागतिक स्तरावर करिअरच्या विस्तृत संधी उपलब्ध आहेत. आधुनिक उद्योगव्यवस्थेच्या प्रगतीमध्ये मेकॅट्रॉनिक्स अभियांत्रिकी ही महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असून भविष्यातील तंत्रज्ञान विकासासाठी ही शाखा प्रभावी ठरणार आहे.





भगवान महावीर जयंती निमित्त नगरमध्ये शोभायात्रा काढण्यात येवून आनंदधामच्या प्रांगणात साधूसाध्वीजींच्या सान्निध्यात स्वामींचे गुणगान गाण्यात आले. शोभायात्रेची विविध क्षणचित्रे.

# भगवान महावीर जयंती निमित्त शोभायात्रा, 'त्रिशला नंदन वीर की, जय बोलो महावीर की' जयघोष

## आनंदधामच्या प्रांगणात साधूसाध्वीजींच्या सान्निध्यात स्वामींचे गुणगान, विविध स्पर्धांचे बक्षिसे जाहीर

नगर – भगवान महावीर स्वामींची जयंती (जन्मकल्याणक) मंगळवारी नगरमध्ये विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. यानिमित्त सकाळी सकल जैन समाजातर्फे शहरात शोभायात्रा काढण्यात आली. याशिवाय चौक सजावट, रांगोळी स्पर्धाही घेण्यात आली. आनंदधामच्या पवित्र प्रांगणात साधूसाध्वीजींनी भगवान महावीर स्वामी यांच्या जीवन चरित्रावर प्रवचन दिले.

भगवान महावीर दिनी सकाळी ७.३० वाजता कापड बाजार जैन मंदिरापासून प्रारंभ झाला. या शोभायात्रेत सनई, नगारा, चौ बॅण्ड पथक, डोक्यावर मंगल कलश घेतलेल्या मुली, विविध वेशभूषा परिधान केलेले लहान मुले, मुली, त्यानंतर पांढरे वस्त्र परिधान केलेले पुरुष व लाल साड्या परिधान केलेल्या महिला भगिनी सहभागी झाल्या होत्या. भगवान महावीर स्वामींची प्रतिमा असलेले वाहन रथ व शेवटी अनुकंपा गाडीही होती. आनंद संस्कार शिक्षा अभियान मंडळाच्या मुला मुलींनी आकर्षक प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच त्यांनी हातात जैन ध्वज व भगवान महावीरांचे संदेश असलेले फलक घेवून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.





श्री भगवान महावीर जयंती निमित्त अहिल्यानगर शहरात ठिकठिकाणी चौक सजावट करण्यात आली होती.

कापडबाजार जैन मंदिर येथून निघालेली शोभायात्रा शहरातील विविध मार्गांवरून धार्मिक परीक्षा बोर्ड आनंदधाम येथे दाखल झाली. शोभायात्रा मार्गावर विविध मंडळे, जैन भाविकांनी आकर्षक चौक सजावट केली होती. रस्त्यावर आकर्षक रांगोळ्या काढून शोभायात्रेचे स्वागत करण्यात आले. त्रिशलानंदन वीर की, जय बोलो महावीर की अशा घोषणा देण्यात आल्या.

आनंदधाम येथे महाराष्ट्र प्रवतर्क कुंदनऋषीजी महाराज, प्रबुध्द विचारक आदर्शऋषीजी महाराज, आलोकऋषीजी महाराज आदिठाणा, महासतीजी सेवाभावी सत्यप्रभाजी म.सा., दिव्य र्शनाजी म.सा., सम्यक दर्शनाजी म .सा., कंचनकवरची म.सा., अर्चनाजी महाराज (मीरा), चंदनबालाजी म.सा, राजस्थानी प्रवर्तनी सुधाजी म.सा., अनूपज्योतीजी म.सा., आभाजी म.सा. आदि समस्त विराजित महासतीजी आदी साधूसाध्वीजींच्या उपस्थितीत प्रवचन तथा गुणगाण झाले. ब्राम्ही युवती मंचच्या सदस्यांनी भगवान महावीर यांच्या जीवनावर आधारित नाटिका सादर केली. जैन कॉन्फरन्सच्या अंतर्गत महिलांनी डॉ. सुधा कांकरिया यांच्या मार्गदर्शनाखाली 'बेटी बचाव बेटी पढाओ'ची शपथ घेतली.

यावेळी श्रावक संघाचे अध्यक्ष हस्तीमल मुनोत, कापड बाजार जैन मंदिराचे अध्यक्ष सुभाष मुथा, बडीसाजन श्री संघाचे अध्यक्ष पेमराज बोथरा, श्रावक संघाचे सेक्रेटरी संतोष बोथरा, उपाध्यक्ष आनंदराम मुनोत, अशोक (बाबूशेठ) बोरा, संतोष गांधी, डॉ. सुधा कांकरिया आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी महाराज म्हणाले की, भगवान महावीर यांच्या जन्माला जन्मकल्याणक म्हटले जाते. जन्मकल्याणक हे आत्म्याला अंधारातून प्रकाशाकडे घेवून जाणारे असते. आपल्याला प्राप्त झालेल्या आत्मज्ञानाचा उपयोग त्यांनी समस्त मानव जातीच्या कल्याणासाठी केला. अहिंसा, सत्य आणि अपरिग्रहाचा विचार त्यांनी कायम मांडला. जो आजच्या काळातही तितकाच महत्त्वपूर्ण आहे.

आदर्शऋषीजी महाराज म्हणाले की, आज हजारो वर्षानंतरही भगवान महावीर स्वामींचे विचार मानव जातीला तारणारे आहेत. यातूनच त्यांची महानता कळून येते. आपण भगवान महावीरांचे अनुयायी आहोत याचा अभिमान बाळगला पाहिजे. आजच्या जगात युध्दजन्य परिस्थिती आहे. अशावेळी भगवान महावीरांच्या विचारांची गरज आहे. भगवान महावीर यांच्यामुळे आपण आहोत हे लक्षात ठेवून प्रत्येकाने मनोमन त्यांचे तत्वज्ञान जीवनात अंमलात आणण्याचा संकल्प करावा. कार्यक्रमाच्या शेवटी गौतम प्रसादीची व्यवस्था करण्यात आली.

जैन मंदिराचे अध्यक्ष सुभाष मुथा यांनी भगवान महावीर जीवन मनोगत करून विविध स्पर्धांचा निकाल जाहीर केला.

चौक सजावट स्पर्धा निकाल पुढीलप्रमाणे– प्रथक क्रमांक– गुगळे परिवार (चितळे रोड), व्दितीय क्रमांक – बोथरा परिवार (आडते बाजार), तृतीय – दिगंबर जैन मंदिर, महाजन गल्ली, उत्तेजनार्थ – जय आनंद फौंडेशन, आडते बाजार, जय आनंद महावीर युवक मंडळ, नवीपेठ, वर्धमान तरूण मंडळ, ख्रिस्त गल्ली.

रांगोळी स्पर्धा निकाल – प्रथम क्रमांक – गुगळे परिवार (चितळे रोड) रोहित, स्नेहल, काजल, रचना, सिया गुगळे. द्वितीय क्रमांक – दर्शना, प्रेक्षा नहार, रॉयल फर्निचर, नवीपेठ, तृतीय – दिगंबर जैन मंदिर, महाजन गल्ली, सपना कासलीवाल, उत्तेजनार्थ – आरती कटारिया, मिनल पारख, राखी गांधी, पूनम चोरडिया, बोथरा परिवार (आडते बाजार), दीपाली नितीन मुनोत, जय आनंद महावीर युवक मंडळ नवीपेठ, रूपाली काठेड, महाजन गल्ली.

चौक सजावट व रांगोळी स्पर्धेचे परीक्षण सौ. शैला गांधी व सौ. संगीता गांधी यांनी केले.



महावीर जयंतीनिमित्त शहरातून निघालेल्या मिरवणुकीचे जय जिनेंद्र, जय महावीर अशा गजरात नवीपेठ येथे स्वागत करण्यात आले.

# जय जिनेंद्र, जय महावीर स्वामींच्या गजरात जय आनंद महावीर मंडळातर्फे स्वागत

नगर – जैन धर्माचे चोवीसावे तीर्थंकर भगवान महावीर स्वामी यांची जयंती (जन्म कल्याणक) नगर शहरात भक्तीमय वातावरणात साजरी झाली.

सत्य व अहिंसेचा संदेश देणाऱ्या भगवान महावीरांच्या विचारांचे स्मरण करीत नवीपेठ येथील जय आनंद महावीर युवक मंडळाने दरवर्षीप्रमाणे महावीर स्वामींचा जगा व जगू द्या हा संदेश दिला. त्रिशला माता यांच्या १४ स्वप्नांची शिकवण देणारी चौक सजावट करताना मंडळाने केली होती. अहिंसा परमो धर्मः, समस्त प्राणीमात्राची सेवा, जगा आणि जगू द्या असे संदेश या सजावटीतून देण्यात आले.

महावीर जयंतीनिमित्त शहरातून निघालेल्या मिरवणुकीचे जय जिनेंद्र, जय महावीर अशा गजरात नवीपेठ येथे स्वागत करण्यात आले.

यावेळी अध्यक्ष शैलेश मुनोत, सेक्रेटरी आनंद मुथा, चेतन गुगळे, सचिन कोठारी, शरद मुथा आर्दीसह पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते

रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करताना मंडळाने यंदा चौक सजावट करताना त्रिशला माता यांची १४ स्वप्ने साकारली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पुरुष, महिला सदस्यांनी परिश्रम घेतले.

# महावीर स्वामींच्या जयजयकाराने दाळमंडई परिसर दुमदुमला, 'जय आनंद फाउंडेशन'च्या वतीने शोभायात्रेचे उत्साहात स्वागत

नगर – जैन धर्माचे चोविसावे तीर्थंकर भगवान महावीर स्वामींच्या जयंतीनिमित्त नगर शहरातून जैन धर्मियांच्या वतीने शोभायात्रा काढण्यात आली होती. याचे जय आनंद फाउंडेशनच्या वतीने दाळमंडई येथे स्वागत करण्यात आले. यानिमित्ताने जय आनंद महावीर चौकात भगवान महावीर स्वामींच्या मूर्ती भवती आकर्षक सजावट करून सुंदर रांगोळी रेखाटण्यात आली होती. यावेळी भगवान महावीर स्वामींचा जयजयकार करत त्रिशला नंदन विर की जय बोलो महावीर की..., जय महावीर जय आनंद..., वंदे विरम् अशा घोषणांनी दाळमंडई परिसर दुमदुमून गेला. यावेळी फाउंडेशनच्या वतीने थंडाई दुधाचे वाटप करण्यात आले. यावेळी आनंद संस्कार शिक्षा अभियानच्या विद्यार्थ्यांनी 'अपरिग्रह आणि आसत्येय खऱ्या आनंदाचा मार्ग' हे पथनाट्य सादर करून सर्वांचे लक्ष वेधले.



भगवान महावीर स्वामींच्या जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या शोभायात्रचे डाळमंडई चौकात जय आनंद फाउंडेशनच्या वतीने स्वागत करण्यात आले.

यावेळी फाउंडेशनचे संस्थापक कमलेश भंडारी, अध्यक्ष अमित काबरा, प्रोजेक्ट चेअरमन पवन बिहाणी, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, मनोज लोंढे, सुशांत जाधव, डॉ.विजय भंडारी, प्रा.माणिक विधाते, सुवेंद्र गांधी, सीए किरण भंडारी आर्दीसह सदस्य, महिला सदस्या व समाजातील नागरिक उपस्थित होते.

यावेळी मनोज चोपडा, योगेश मुनोत, सुदर्शन दिवटे, रितेश पारख, निलेश छाजेड, मुकेश बरमेचा, संजय सुराणा, वैभव मेहेर, सुमीत लोढा, सचिन शिंगवी, गणेश लद्धा, गौरव बोरा, कुणाल बडजाते, दिपेश लोढा, कमलेश मुथा, विनोद कटारिया, रोहित चुत्तर, गौतम मुथा, महिला आघाडीच्या मधुबाला भंडारी, प्रणीता भंडारी, पूजा बोरा, दिपाली काबरा, अमृता झंवर, राधा लद्धा, कीर्ती कटारिया, पूजा शिंगवी, वैशाली कटारिया, प्रिया वर्मा, पूजा चोपडा, दीपिका भंडारी व सदस्य व महिला सदस्य उपस्थित होते.

# महावीर जयंतीनिमित्त चारा व औषध वाटप

## जायंट्स ग्रुपचा उपक्रम

नगर – भगवान महावीर स्वामी यांच्या जन्मकल्याण दिनानिमित्त जायंटस् ग्रुप ऑफ अहिल्यानगरच्या वतीने अरणगाव रोडवरील पांजरपोळ गोरक्षण संस्थेमध्ये जनावरांना चारा वाटप करण्यात आले. तसेच औषधे देखील पुरविण्यात आली.



भगवान महावीर जयंतीनिमित्त जायंटस् ग्रुपतर्फे जनावरांना चारा व औषध वाटप करण्यात आले.

यावेळी जायंटस् वेल्फेअर फाउंडेशनचे स्पेशल कमिटी सदस्य संजय गुगळे, ग्रुपचे अध्यक्ष राजेंद्र कटारिया, सचिव अभय मुथा, अनिल गांधी, दर्शन गुगळे, अमित मुनोत, श्वेता मुनोत, नूतन गुगळे, शितल कदम, पांजरपोळ गोशाळेचे साहेबराव काळे, लक्ष्मण शिंदे आदी उपस्थित होते.

यावेळी संजय गुगळे म्हणाले, भगवान महावीर यांनी आयुष्यभर अहिंसा, करुणा आणि सेवा भावनेचा प्रचार केला. त्यांच्या शिकवणुकीनुसारच आपण या जयंतीनिमित्त प्राणिमात्रांप्रती माणुसकीचे कर्तव्य बजावत आहोत. समाजामध्ये दयाभाव वाढवणे, निसर्ग आणि प्राणिमात्रांशी सुसंवाद साधणे हे आपल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे. अशा उपक्रमांमुळे केवळ प्राणीच नव्हे तर मानवतेचाही सन्मान होत असल्याचे त्यांनी सांगितले.



भगवान महावीर यांच्या जन्मकल्याणक दिनाचे औचित्य साधून शहरातील दर्शन चाणोदिया मित्र परिवाराच्या वतीने भाविकांना प्रभावना वाटप करण्यात आले.

# भगवान महावीर जन्मकल्याणक दिनी दर्शन चाणोदिया व सहकाऱ्यांतर्फे प्रभावना वाटप

नगर – भगवान महावीर यांच्या जन्मकल्याणक दिनाचे औचित्य साधून शहरातील दर्शन चाणोदिया मित्र परिवाराच्या वतीने सर्व भाविकांना प्रभावना वाटप करण्यात आले. भगवान महावीर यांच्या 'अहिंसा परमो धर्म' आणि 'जियो और जीने दो' या विचारांचा वारसा पुढे चालवत हा सामाजिक उपक्रम अत्यंत उत्साहात राबविण्यात आला.

याप्रसंगी दर्शनी चाणोदिया यांच्यासह मित्र परिवारातील सदस्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून भाविकांचे स्वागत केले आणि त्यांना प्रभावनेचे वाटप केले. या उपक्रमात सीए आनंद गांधी, रोहीत चंगेडिया, सीए हर्षद गुगळे, सीए संकेत राठोड, सीए मयूर कासवा, सीए आदित्य शहा, ऋषभ भंडारी, हर्षल गांधी, अक्षय शिंगी, अंकित राका, भावेश चंगेडिया, पवन शर्मा, राहुल कुलट, तुषार इंगळे यांनी सक्रिय सहभाग नोंदवत सहकार्य केले.

आनंद गांधी म्हणाले की, भगवान महावीर यांनी जगाला शांती, संयम आणि करुणेचा संदेश दिला आहे. त्यांच्या शिकवणीतून प्रेरणा घेऊन समाजसेवा करणे हे आमचे कर्तव्य आहे. केवळ उत्सव साजरा न करता तो सेवेच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचवावा, या उद्देशाने आम्ही दरवर्षी असे उपक्रम राबवतो. सर्व भाविकांच्या चेहऱ्यावरील समाधान हेच आमच्या कार्याचे यश आहे.

जैन समुदायासोबतच इतर सर्व समाजघटकांनी या उपक्रमाचे कौतुक केले असून, चाणोदिया मित्र परिवाराच्या या कार्यामुळे उत्सवात एक वेगळीच रंगत पाहायला मिळाली.

# महावीर जयंती : 'स्नेहबंध'कडून बंधुभावाचा संदेश

नगर – जैन धर्माचे चोवीसावे तीर्थंकर भगवान महावीर यांच्या जयंतीनिमित्त स्नेहबंधचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या हस्ते श्री छत्रपती शिवाजीमहाराज चौक, भिंगार, अहिल्यानगर येथे (श्री गुरु वर्धमान भवन जैन स्थानक, भिंगार) भगवान महावीरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी चंदनाचा हार अर्पण करून उपस्थितांना महावीर जयंतीच्या शुभेच्छा देण्यात आल्या.



स्नेहबंध च्या वतीने भगवान महावीर यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन करताना डॉ. उद्धव शिंदे.

डॉ. शिंदे म्हणाले, भगवान महावीरांनी दिलेला सत्य, अहिंसा, करुणा आणि संयमाचा संदेश आजच्या काळात अत्यंत महत्त्वाचा आहे. समाजाने आत्मकल्याणासाठी अहंकार, हिंसा आणि अन्यायाचा त्याग करून सदाचाराचा मार्ग स्वीकारावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी उपस्थितांनी महावीरांच्या विचारांचे स्मरण करून समाजात शांतता, बंधुभाव आणि मानवतेचा संदेश रुजवण्याचा संकल्प केला.

कार्यक्रमास महेश नागरी पतसंस्थेचे चेअरमन डॉ.अशोक चंगेडे, छावणी परिषद नामनिर्देशित सदस्य वसंत राठोड, भंडारी ट्रेडर्सचे संचालक सचिन भंडारी, भिंगार अर्बन बँकेचे संचालक रुपेश भंडारी, संचालक विनोद भंडारी, श्रीराम मेडिकलचे संचालक निशांत पानसरे, योग प्रशिक्षक रामचंद्र लोखंडे, प्रथमेश राठोड व जैन समाजातील नागरिक उपस्थित होते.

# आठरे पाटील पब्लिक स्कूलचा अत्याधुनिक जलतरण तलाव १ एप्रिलपासून सर्वांसाठी खुला

नगर – अहिल्यानगर शहराच्या सावेडी भागातील वडगांव–गुप्ता रोडवरील, आठरे पाटील पब्लिक स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या वसतिगृहात्मक शाळेचा अद्ययावत जलतरण तलाव विद्यार्थ्यांसाठी तयार केलेला असून पश्चिम महाराष्ट्रातील फ्रेंच तंत्रज्ञानावर आधारित हा एकमेव जलतरण तलाव आहे. जलतरण तलावासह शॉवर रुम, बाथरुम, लाईफगार्ड, चेंजिंग रुम मुलां–मुलींसाठी स्वतंत्र सुविधा उपलब्ध आहेत. देज वायो पूल्स या फ्रेंच कंपनीने या जलतरण तलावाची उभारणी केलेली असून, त्यात तीन स्वयंचलित फिल्टर मशिन्स बसविण्यात आलेल्या आहेत. असा जलतरण तलाव सर्वांसाठी १ एप्रिल पासून खुला करण्यात येणार आहे.

जलशुद्धीकरणासाठी निरुपद्रवी अशी रसायने फ्रांस देशातून मागविली जातात, या रसायनांमुळे मानवी त्वचेला कोणताही अपाय होत नाही. जलतरण तलावात जलशुद्धीकरणासाठी विशेष यंत्रसामग्री बसविण्यात आली आहे. पाण्यातील क्लोरीनचे प्रमाण आणि पी. एच. ची. गुणवत्ता दररोज तपासली जाते. जलतरण तलावातील पाणी एकदम शुद्ध, स्वच्छ आणि पारदर्शक असते. जलतरण तलावाच्या पाण्यात कधीही शेवाळ होत नाही.

जलतरणाचे शारीरिक फायदे असे की, जलतरणाने शारीरिक शक्ती आणि क्षमतांचा विकास होतो. रोग प्रतिकारक शक्तीमध्ये वाढ होऊन, मानसिक कणखरता विकसित होते. जलतरणाने संपूर्ण शरीराला व्यायाम मिळतो. तरी कुशल, अनुभवी अशा प्रशिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली सदर जलतरण प्रशिक्षणात सहभागी होण्याचे आवाहन संस्थेच्या अध्यक्षा डॉ. अंजली आठरे पाटील व कार्यकारी विश्वस्त डॉ. अनिल आठरे पाटील यांनी केले आहे.

